# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१८

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक २६ नोव्हेंबर, २०१८ / अग्रहायण ५, १९४० ( शके )**

| | |
|---|---|
| **(१) आदिवासी विकास मंत्री**<br>**(२) उद्योग व खनिकर्म मंत्री**<br>**(३) उर्जा, नवीन व नवीकरणीय उर्जा, राज्य उत्पादन शुल्क मंत्री**<br>**(४) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री**<br>**(५) सहकार, पणन व वस्त्रोद्योग मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ७१**

---

### धुळे जिल्हयातील आदिवासी समाजाच्या विद्यार्थ्यांना नामांकित इंग्रजी शाळेत प्रवेश देण्याबाबत

**(१) * १२८५९१ श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विभागामार्फत अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना नामांकित इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये प्रवेश दिला जातो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शैक्षणिक वर्ष सन २०१८-१९ साठी धुळे जिल्हयातील आदिवासी विद्यार्थ्यांना अद्यापी नामांकित इंग्रजी माध्यमांच्या शाळांमधून प्रवेश दिला नसल्यामुळे जवळपास ६० पेक्षा जास्त पालकांनी आझाद मैदान, मुंबई येथे बेमुदत उपोषण सुरु केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संबंधित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाऊ नये म्हणून त्यांना नामांकित इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये प्रवेश मिळवून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.

शासन निर्णय दिनांक १८.५.२०१८ च्या निकषानुसार दर्जेदार इंग्रजी माध्यमांच्या शाळा उपलब्ध होऊ न शकल्याने काही विद्यार्थ्यांना सदर योजनेअंतर्गत प्रवेश देता आले नाही.
(३) विभागांतर्गत आयएसओ मानांकन प्राप्त असलेल्या व सोयीसुविधा असलेल्या १२ शासकीय आश्रमशाळांमध्ये प्रत्येक शाळेत ५० विद्यार्थ्यांची इयत्ता १ ली करीता एक इंग्रजी माध्यमाची अतिरिक्त तुकडी सूरु करण्यात येत आहे. शासकीय आश्रमशाळेत पसंतीनुसार प्रवेश घेण्यासाठी संबंधीत पालकांना आव्हान करण्यात आले असून विद्यार्थ्यांना तात्काळ प्रवेश देण्याबाबत प्रकल्प कार्यालय, धुळे यांचे स्तरावरुन सर्व मुख्याध्यापकांना निर्देश दिले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## इंचलकरजी (जि.कोल्हापूर) व विटा माधवनगर (जि.सांगली) येथील यंत्रमाग व्यवसायास उर्जितावस्था मिळण्याबाबत

**(२) * १३२४२१ श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर**

**(चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इंचलकरजी (जि.कोल्हापूर) व विटा माधवनगर (जि.सांगली) येथे यंत्र मागावर उत्पादीत होणाऱ्या कापडाची विक्री करतांना उत्पादन खर्चापेक्षा एक ते दीड रुपये प्रति मिटरला कमी भाव मिळत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे यंत्रमाग धारकांनी यंत्रमाग व्यवसाय बंद केले असून, यंत्रमाग कोणी विकत घेत नसल्याने भंगारात विकले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे यंत्रमागावर काम करणारे हजारो कामगार बेरोजगार झाल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने यंत्रमाग व्यवसाय ऊर्जितावस्थेत आणण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) नाही.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या बाजारात विना परवाना दुकाने सुरू असल्याबाबत

**(३) * १३१८७६ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या किराणा भुसार मालाच्या बाजारात विना परवाना दुकाने सुरू असल्याचे माहे ऑक्टोंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बाब निदर्शनास आल्यानंतर प्रशासकीय मंडळाच्या आदेशानुसार प्रशासनाकडून २७ दुकानांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विना परवाना किंवा परवान्याचे नूतनीकरण न करता दुकाने चालू ठेवणाऱ्यांची संख्या त्याहून अधिक आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय निदर्शनास आले व त्यानुषंगाने सदर प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) व (२) नाही.

(३) नाही.

(४) नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक येथील आदिवासी विकास महामंडळाच्या प्रकल्प कार्यालयात झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(४) * १२८९०८ श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील आदिवासी विकास महामंडळाच्या प्रकल्प कार्यालयात डिझेल इंजिन व गॅस युनिट योजनांमध्ये गैरव्यवहार करून शासनाची सुमारे ४ कोटी रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार दिनांक ६ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याच विभागात माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान लघु उपसा सिंचन योजनेत देखील कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, त्यानुसार संबंधित दोषी अधिकाऱ्यांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) होय.

(२) नाही.

(३) सन २००४ ते सन २००९ या कालावधीत आदिवासी विकास विभागामार्फत राबविण्यात येणा-या विविध योजनांमध्ये झालेल्या अनियमिततेच्या अनुषंगाने न्या.गायकवाड समितीने चौकशी करुन आपला चौकशी अहवाल मा.न्यायालयास सादर केला असून, त्याची प्रत मा.न्यायालयाकडून शासनाने उपलब्ध करुन घेतली आहे.

प्रस्तुत चौकशी अहवालामध्ये सदर अनियमिततेच्या अनुषंगाने काही प्रकरणी संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुद्ध एफ.आय.आर. दाखल करण्याची, काही प्रकरणी संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुद्ध शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्याची शिफारस न्या.गायकवाड समितीने केली आहे. या अनुषंगाने कार्यवाही करण्याकरीता शासनाच्या वतीने आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांना प्राधिकृत करण्यात आले आहे.

न्या.गायकवाड समितीच्या अहवालामध्ये नमुद परिच्छेदांनुसार ज्या ठिकाणी एफ.आय.आर. दाखल करावा असे नमुद करण्यात आले आहे त्याबाबत संबंधीत पोलीस स्टेशन मध्ये तक्रारी दाखल करण्यात आल्या आहेत. तसेच, ज्या ठिकाणी शिस्तभंगविषयक कार्यवाही करावी असे नमुद करण्यात आले आहे त्याबाबत संबंधितांविरुद्ध विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

(४) समितीने केलेल्या शिफारशीनुसार सदर प्रकरणी संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर मुंबईनाका पोलीस स्टेशन, नाशिक शहर येथे एफ.आय.आर. (F.I.R.) दाखल करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील सर्व जिल्हयांमध्ये कृषीपंपांना बारा तास वीज पुरवठा करण्याबाबत

**(५) * १२७०२० श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्वच जिल्हयात कृषीपंपाना आठ तास वीज पुरवठा करण्याचे शासनाचे धोरण आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हे धोरण डावलून पूर्व विदर्भातील जिल्हयांना आठऐवजी १२ तास वीजपुरवठा करण्याबाबत राज्य सरकारने वीज नियामक मंडळाला माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान पत्र दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वीज नियामक मंडळाची मंजूरी मिळण्याआधीच महावितरण कंपनीने पूर्व विदर्भात १२ तास वीजपुरवठा सुरु केला असल्याने राज्यातील उर्वरित जिल्हयातील शेतकऱ्यांवर अन्याय झाला असून सर्वच जिल्हयातील कृषीपंपाना आठ ऐवजी १२ तास वीज पुरवठा करण्यात यावा अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) सदर जिल्हयांमध्ये झालेल्या कमी व खंडीत पावसामुळे उभ्या पिकांचे नुकसान टाळण्यासाठी पिकांना संरक्षित सिंचनाची व्यवस्था करण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी यांच्या शिफारशीनुसार पूर्व विदर्भातील ६ जिल्हयांमधील कृषीपंपाना ८ ऐवजी १२ तास वीज पुरवठा करण्यात आला होता.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प डहाणू (जि.पालघर) विभागात आदिवासी विकास योजनेत झालेला गैरव्यवहार

**(६) * १३१७८७ श्री.अनिल (अण्णा) गोटे (धुळे शहर), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, डहाणू (जि.पालघर) विभागात आदिवासी विकास योजनेत कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१२ ते सन २०१५ या काळात येथील आदिवासींच्या विकसाकरिता विविध योजना राबविण्याकरिता कृषीरत्न कातकरी फळे, फुले, भाजीपाला, औषधी शेती संस्था मर्यादित आणि कातकरी आदिम विकास संस्था यांना कामे देण्यात आली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू दोन्ही संस्थांच्या अध्यक्षांनी पदाधिकाऱ्यांच्या संगनमताने चुकीचा अहवाल सादर केला असून कागदोपत्री कामे पूर्ण झाल्याचे दिसत असले तरी प्रत्यक्षात गरीब लाभार्थ्यांना योजनेचा लाभ न देता शासनाची फसवणूक करून स्वत:च्या फायद्यासाठी सुमारे १ कोटी ६५ लाख ४५ हजार रूपयांचा गैरव्यवहार केल्याप्रकरणी डहाणू पोलीस ठाण्यात, दिनांक २९ जून, २०१८ रोजी वा त्या सुमारास गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,शासनाने या गैरव्यवहाराची चौकशी केली आहे काय, तद्‌नुसार चौकशीत काय निष्पन्न झाले, त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) व (२) होय,हे खरे आहे.
(३), (४) व (५) प्रकल्प कार्यालय, डहाणू मार्फत सदर विहीर योजना व घरकुलांची तपासणी करण्यात आलेली आहे. प्राप्त अहवालानुसार दोषी संस्थांविरूद्ध मनोर पोलिस स्टेशन येथे प्रकल्प कार्यालय, डहाणू मार्फत फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला त्यानंतर सदर प्रकरण डहाणू पोलिस स्टेशन येथे वर्ग करण्यात आले. सध्या प्रकरण आर्थिक गुन्हे शाखेकडे आहे.

-----------------

## मौजे करवंड (ता.चिखली, जि.बुलढाणा) येथील आत्महत्याग्रस्त कुटूंबाचा कर्जमाफीच्या यादीमध्ये समावेश करण्याबाबत

**(७) * १३३८३२ श्री.राहुल बोंद्रे (चिखली), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे करवंड (ता.चिखली, जि.बुलढाणा) येथील आत्महत्याग्रस्त कुटूंबाकडे असलेले पतसंस्थेचे १ लाख ४० हजार कर्ज नापीकी व दुष्काळामुळे फेडू शकत नसल्याने शासनाने विशेष बाब म्हणून उक्त कर्जाचा कर्जमाफीमध्ये समावेश करण्यात यावा, याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा. मुख्यमंत्री यांना माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त निवेदनाच्या अनुषंगाने आत्महत्याग्रस्त कुटूंबियांचे कर्ज माफ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय.

(२) व (३) होय, मृतक श्री. विठ्ठल मोतीराम राठोड रा.करवंड, ता.चिखली, जि.बुलढाणा हे स्थानिक करवंड ग्रामसेवा सहकारी सोसायटीचे सभासद नसल्याने त्यांच्यावर कोणतीही थकबाकी नाही. मृतकाचे वडील श्री. मोतीराम राठोड हे करवंड ग्रामसेवा सहकारी सोसायटीचे सभासद असून त्यांचे पिक कर्ज मुद्दल व व्याजासह थकबाकी रु.४४,३६० व मध्यम मुदत कर्ज मुद्दल व व्याजासह थकबाकी रु.२९,९३० अशी एकुण थकबाकी रु.७४,२९० आहे. यापैकी पीककर्ज रु. ४४,३६० याचा समावेश कर्जमाफीच्या ऑनलाईन अर्जात करण्यात आलेला असून त्याची छाननी करण्यात येत आहे. तसेच मध्यम मुदत कर्ज रु.२९,९३० चा समावेश अर्जात केलेला नसल्याने त्याचा योजनेच्या लाभासाठी विचार करता येणार नाही.

मृतकाची आई श्रीमती रूख्मीनाबाई राठोड यांच्यावर करवंड ग्रामसेवा सहकारी सोसायटीची रु.४३,९८० ची थकबाकी होती. सदर कर्जाला छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ अंतर्गत दि.३०.११.२०१७ रोजी कर्जमाफी देण्यात आली असून त्यांना दि.०७.०६.२०१८ रोजी नवीन कर्ज वाटप करण्यात आले.

श्री.मोतीराम राठोड यांच्यावर अदिती अर्बन को-ऑप. क्रेडीट सोसायटी मर्या. बुलढाणा या पतसंस्थेचे रु. १,४०,००० चे कर्ज आहे. सदर कर्ज हे कर्ज माफीच्या निकषांमध्ये बसत नसल्याने कर्जमाफी देण्यात आली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## दि कॉसमॉस को. ऑप. बँकेचे अध्यक्ष व संचालक मंडळांने संगनमत करून केलेला गैरव्यवहार

**(८) * १२६५६८ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथे मुख्यालय असलेल्या दि कॉसमॉस को. ऑप. बँकेचे अध्यक्ष व संचालक मंडळाने संगनमत करून, घोडबंदर (ठाणे) येथील बालाजी कार्स कंपनीचे थकीत झालेले उर्वरित १२.७८ कोटी रुपये कर्ज वसूल करण्यासाठी

कंपनीची भिवंडी-कल्याण रोड व घोडबंदर रोड येथील रुपये ६४ कोटी किंमतीची मालमत्ता मे.कलानी मार्केटिंग कंपनीला १५.९० कोटी इतक्या अल्प किंमतीत परस्पर लिलावाद्वारे विक्री करून कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार करण्यात आल्याचे दिनांक १५ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, सहकार कायद्यातील कलम ८३ आणि कलम ८८ अन्वये तीन महिन्यात चौकशी पूर्ण करून दोषींविरुद्ध कारवाई करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१), (२) व (३) दि कॉसमॉस को.ऑप.बँक लि. ही बँक बहुराज्यीय सहकारी संस्था अधिनियम, २००२ अंतर्गत रुपांतरीत झालेली आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील तरतूदी सदर बँकेस लागू होत नसून बँकेबाबत कामकाज नियमन व संनियंत्रणाचे कोणतेही अधिकार राज्याच्या निबंधकास नाहीत.

बँकेने मे.बालाजी कार्स प्रा.लि. या कंपनीला दिलेल्या रु.२३.८५ कोटी थकीत कर्जाच्या वसूलीसाठी सरफेसी (SARFAESI) कायदा, २००२ अन्वये कारवाई केली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सिरोंचा (जि.गडचिरोली) येथील पातागुडम, रायगुडम, व पेंडालाया गावातील विद्युत खांब दुरुस्त करून वीज पुरवठा सुरु करण्याबाबत

**(९) * १३०३५७ श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिरोंचा (जि.गडचिरोली) येथील तालुक्याच्या अतिदुर्गम भागात माहे मे, २०१८ च्या वादळी पावसात पातागुडम, रायगुडम, व पेंडालाया या ३ गावातील विद्युत खांब कोसळलेले असून अद्याप महावितरण कंपनीने त्याची दुरुस्ती

केली नसल्याने उक्त ३ गावातील नागरिक विजेच्या सुविधेपासून वंचित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ग्रामपंचायतीच्या वतीने दिनांक २ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास संबंधित महावितरण कंपनीच्या उपकेंद्राकडे लेखी निवेदन देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निवेदनाच्या मागणीनुसार शासनाने पाहणी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले, त्यानुसार वीज वितरण कंपनीने पडलेले विद्युत खांब दुरुस्त करुन वीजेचा पुरवठा सुरळीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) मौजे सोमनपल्ली ते पातागुडम जोडणारी ११ के.व्ही.विद्युत वाहिनी ही अतिशय घनदाट जंगल आणि मोठया झाडांमधून गेलेली आहे. माहे मे, २०१८ आणि त्यानंतर माहे जून, जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर, २०१८ च्या कालावधीत वेळोवेळी आलेल्या वादळी पावसामुळे मौजा रायगुडम, पातागुडम व पेंडालया या तीन गावांतील लघुदाब वाहिनीचे ५ खांब, उच्चदाब वाहिनीचे ५३ खांब तुटलेले आहेत. ११ के.व्ही. चे ५ खांब वाकलेले आहेत. तसेच १६४ खांबावरील तारा सरळ कराव्या लागणार आहेत. सदर कामाची निविदा दिनांक ३०.१०.२०१८ रोजी कंत्राटदारास देण्यात आले असून सदरचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्राला वेकोलीच्या भाटाळी खाणीतून कोळसा पुरवठा करणाऱ्या 'पाईप कन्व्हेयर' प्रकल्पाबाबत

**(१०) * १२७३२४ श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्राला वेकोलीच्या भाटाळी खाणीतून थेट कोळसा पुरवठा करण्याचा महत्वाचा टप्पा असलेला सुमारे १७५ कोटींचा 'पाईप कन्व्हेयर प्रकल्प' भूसंपादनात येत असलेल्या अडचणींमुळे प्रलंबित असल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भूसंपादनाची प्रक्रिया प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, हा प्रकल्प तातडीने पूर्ण करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) सदर प्रकल्पासाठी संपादित करावयाच्या खाजगी भूधारकांच्या काही मागण्या नियमास अनुसरुन नसल्यामुळे भूसंपादनाचे काम प्रलंबित आहे.

(२), (३) व (४) भूसंपादनाची प्रक्रिया राबवितांना खाजगी जमीन भूधारकांनी केलेल्या मागण्या नियमास अनुसरुन नसल्यामुळे भूधारकांसोबत वेळोवेळी संपर्क साधून चर्चा करुन भूधारकांना जमीन देण्याबाबत महानिर्मिती कंपनीमार्फत विनंती करण्यात आली. परंतु भूधारकांनी त्यास विरोध केला आहे. तथापि सदरचा प्रकल्प लोकहिताच्या दृष्टीने महत्वाचा असल्याने "महाराष्ट्र शासन राजपत्र सन २०१८ अधिनियम क्र.३७, दिनांक २६.०४.२०१८, भूसंपादन, पुर्नवसन व पुर्नवसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क" मधील कलम १० (ख) नुसार सामाजिक लोकहितास्तव विद्युतीकरणासाठी भूसंपादन अधिनियम, २०१३ च्या प्रकरण क्रमांक २ व ३ लागू करण्यापासून सूट देण्याबाबतचा प्रस्ताव महानिर्मिती कंपनीने शासनास सादर केला असून त्यावर महसूल व वन विभागाकडून पुढील कार्यवाही सूरु आहे.

-----------------

## गडचिरोली येथील इंग्रजी माध्यमाच्या आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना अन्नातून झालेली विषबाधा

**(११) * १३०५८९ श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली येथील इंग्रजी माध्यमाच्या आश्रमशाळेतील सुमारे १५ विद्यार्थ्यांना अन्नातून विषबाधा झाल्याने त्यांना गडचिरोली येथील महिला व बाल रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचे दिनांक ७ ऑगस्ट २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, त्यानुसार सदर घटनेतील दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१), (२) व (३) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,गडचिरोली यांचे कार्यक्षेत्रांतर्गत असणारी शासकीय इंग्रजी माध्यम आश्रमशाळा, गडचिरोली येथे एकलव्य रेसिडेंशियल पब्लिक स्कूल, अहेरी व एकलव्य रेसिडेंशियल पब्लिक स्कूल, चार्मोशी अशा तीन शाळेच्या ७३९ विद्यार्थ्यांची गडचिरोली येथिल वसतिगृहात राहण्याची व भोजणाची एकत्रित व्यवस्था केली आहे.

दि.०६/०८/२०१८ रोजी प्रात: कालची दिनचर्या आटोपुन सकाळी भोजन करुन शाळेत आल्यानंतर ३ विद्यार्थ्यांना पोटात दुखणे, उलटी व मळमळ असा त्रास होत असल्याचे दिसुन आल्याने शाळेतील कर्मचाऱ्यांनी महिला व बाल रुग्णालय, गडचिरोली येथे औषधोपचाराकरीता दाखल केले होते. त्यानंतर ५६ विद्यार्थ्यांनीही तसाच त्रास झाल्याचे निदर्शनास आल्याने त्यांना देखील सदर रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. त्यापैकी १४ विद्यार्थ्यांना रूग्णालयात डॉक्टरांच्या देखरेखीखाली ठेवण्यात आले. सदर १४ विद्यार्थ्यांपैकी १ विद्यार्थ्यास दि.०७.०८.२०१८ रोजी, ९ विद्यार्थ्यांना दि.०८.०८.२०१८ रोजी व ४ विद्यार्थ्यांना दि.०९.०८.२०१८ रोजी रुग्णालयातुन डिस्चार्ज देण्यात आला आहे.

सदर घटनेनंतर अन्न पदार्थाचे नमुने तपासणी करीता अन्न व औषध प्रशासन, नागपूर यांच्याकडे पाठविण्यात आले होते. त्यांचा अहवाल प्राप्त झाला असुन त्यानुसार तपासणी साठी देण्यात आलेल्या अन्न पदार्थांचे नमुने त्यांच्या विहित मानकांनुसार असल्याचे नमुद आहे.

परंतु, रूग्णालयात उपचारासाठी दाखल केलेल्या ८ विद्यार्थ्यांच्या उपचार पत्रिकेत Food Poisoning अशी नोंद असुन प्रथमदर्शनी शाळा प्रशासनाचा हलगर्जीपणा दिसुन आल्याने त्यास जबाबदार असणाऱ्या अधिकारी-कर्मचारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करून त्यांच्याविरूध्द नियमोचित कारवाई करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सुर्यमाळ (ता.मोखाडा, जि.पालघर) येथील आश्रमशाळेच्या इमारतीची झालेली दूरवस्था

**(१२) * १२७२९६ श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सुर्यमाळ (ता.मोखाडा, जि.पालघर) येथील आश्रमशाळेची दुरवस्था झालेली असून छतावरील पत्रे फुटून त्यातून पाणी गळणे, शाळेतील फरशीवर पाणी साचणे, गाद्या निकृष्ट दर्जाच्या असणे, पावसाच्या पाण्याने भींतीही ओल्या होत असणे इ. समस्या असून सदरहु आश्रमशाळेचे बांधकाम ठेकेदाराने सन २०१३ मध्ये सुरु करुनही अद्यापही इमारतीचे काम पुर्ण झालेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आश्रमशाळा इमारतीच्या बांधकामासाठी पालघर जिल्हापरिषदेने सार्वजनिक बांधकाम खात्यास सन २०१३ मध्ये ६ कोटी ४४ लाखांचा निधी मंजूर केला व उक्त बांधकाम सन २०१६ पर्यंत पूर्ण करण्याची अंतिम मुदत होती मात्र उक्त इमारतीचे बांधकाम अपूर्ण अवस्थेत असून आतापर्यंत या इमारतीसाठी ७ कोटी १८ लाख रुपये खर्च झाले असून आश्रमशाळेच्या इमारतीसाठी झालेला १ कोटी २६ लाख रुपये जादा खर्चास मंजूरी देण्यात आलेली आहे काय,

(३) तसेच उक्त आश्रमशाळेच्या इमारतीच्या बांधकामात झालेला गैरव्यवहार व यात सामील अभियंता आणि उपअभियंता तसेच ठेकेदारावर तातडीने कारवाई करावी अशी मागणी पालघर जिल्हा परिषदेचे गटनेते यांनी जिल्हापरिषदेकडे केली असून शासनाने या प्रकरणी चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत दोषी आढळून आलेल्या संबंधिताविरुद्ध कारवाई करण्याबाबत व आश्रमशाळेचे बांधकाम पूर्ण करुन विद्यार्थ्यांना योग्य दर्जाच्या सुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) होय, हे अशंत: खरे आहे.

शालेय व्यवस्थापन समितीला मिळालेल्या रु.५.०० लक्ष निधीतून बांधकाम व्यवस्थापन कक्षाकडून सदर शाळेच्या जुन्या इमारतीची दुरुस्ती करण्यात आली आहे. सुर्यमाळ भागात पावसामुळे ४ महिने कामाची प्रगती राखता येत नाही. माहे डिसेंबर, २०१८ पर्यंत नवीन शालेय इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्याचे व वसतीगृहाचे बांधकाम मार्च, २०१९ पर्यंत पुर्ण करण्याचे कंत्राटदाराने लेखी प्रतिज्ञापत्राद्वारे मान्य केले आहे.
(२) या विभागामार्फत दि. २७.१०.२०१० च्या आदेशान्वये रु. ६१४.४४ लक्ष इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. सदर मान्यतेनुसार प्रत्यक्षात जुलै, २०१३ मध्ये बांधकाम सुरु करण्यात आले. त्यानुसार माहे जुलै २०१६ पर्यंत सदरचे बांधकाम पूर्ण होणे आवश्यक होते. सद्यस्थितीत शालेय इमारत अंतीम टप्प्यात आहे व मुलींचे वसतीगृह प्लींथ लेव्हलवर आहे. वाढीव खर्चास विहित प्राधिकाऱ्याची मान्यता घेण्यात आली नव्हती.
(३) व (४) होय, शासकीय आश्रमशाळा, सुर्यमाळ येथील शालेय इमारत व वसतीगृहाचे बांधकामाचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्यात आले असता, त्यामध्ये शालेय इमारतीचे बांधकाम चांगल्या दर्जाचे दिसून आले व वसतीगृहाचे बांधकाम योग्य दर्जाचे नसल्याचे दिसून आल्याने याबाबत सबंधित दोषी अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द विभागीय चौकशी सुरु करुन सबंधित ठेकेदार यांच्याविरुध्द कार्यवाही करुन काळया यादीत टाकण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागास कळविण्यात आले आहे. माहे डिसेंबर, २०१८

पर्यंत शालेय इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत व मार्च, २०१९ पर्यंत वसतीगृहाचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत ठेकेदार यांनी लेखी प्रतिज्ञापत्राद्वारे मान्य केले आहे. विद्यार्थ्यांना योग्य दर्जाच्या सुविधा पुरविण्यात येत आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जैनापूर (ता.शिरोळ, जि.कोल्हापूर) येथील शिवम इंडियन क्युझिन प्रा.लि. पुणे या साखर कारखान्याने शेतकऱ्यांची थकित देयके देण्याबाबत

**(१३) * १२८११९ श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जैनापूर (ता.शिरोळ, जि.कोल्हापूर) येथील श्री अंबाई मागासवर्गीय शेतीमाल प्रक्रिया सहकारी संस्था अंतर्गत असलेल्या शिवम इंडियन क्युझिन प्रा.लि. पुणे या साखर कारखान्याने गत हंगामातील शेतकऱ्यांची ३ कोटी ६० लाख रुपये देयके मागील सात महिन्यांपासून दिलेली नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या शेतकऱ्यांना अद्यापपर्यंत रक्कम अदा न करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदरची थकीत रक्कम शेतकऱ्यांना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय. अंशत: खरे आहे.

गाळप हंगाम २०१७-१८ मध्ये श्री.अंबाई मागासवर्गीय शेतीमाल प्रक्रिया सहकारी संस्था मर्या., जयसिंगपूर खांडसरी साईट, जैनापूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर अंतर्गत असलेल्या शिवम इंडियन क्युझिन प्रा.लि., पुणे या कारखान्याकडे एकूण रु.३,९०,०६,६६२/- इतकी FRP रक्कम देय होती. त्यापैकी रु.१,६७,५२,९५०/- इतकी रक्कम सदर कारखान्याने अदा केलेली आहे व उर्वरीत रु.२,२२,५३,७१२/- इतकी देय रक्कम थकीत आहे.

(२) सदर खांडसरीने बॉयलर रिट्युबिंगचे काम केल्यामुळे भांडवल खर्च झाला. तसेच, ऊस तोडणी वाहतुकीमध्ये संस्थेचे भांडवल थकीत राहिल्याने संस्थेचे आर्थिक नुकसान झाले. त्यामुळे ऊसबिल देण्यात विलंब होत आहे.
(३) सदरची थकीत देणी प्राधान्याने देण्याबाबत प्रादेशिक सहसंचालक (साखर), कोल्हापूर यांनी संबंधित खांडसरीला दि.१४.११.२०१८ च्या पत्रान्वये सूचना दिल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद शहरात जीटीएल व महावितरण यांनी संगनमताने केलेला गैरव्यवहार

**(१४) * १२६८३३ श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद शहराचा वीज पुरवठा आधी महावितरणकडून काढून जीटीएल या खासगी कंपनीकडे दि. ११ नोव्हेंबर, २०११ रोजी सोपविण्यात आला आणि नंतर पुन्हा सन २०१५ मध्ये महावितरणकडे देण्यात आला या व्यवहारात सुमारे १५०० कोटी रूपयांचा गैरव्यवहार झाल्याची तक्रार काही नागरिकांनी तसेच लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्र्यांकडे केली असुन वारंवार स्मरणपत्रेही पाठविण्यात आलेली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तत्कालीन मुख्य अभियंता, महावितरण औरंगाबाद यांना निलंबित करुन त्यांच्या मालमत्तेचीही चौकशी करण्याची मागणी मा.मुख्यमत्र्यांकडे एका निवेदनाद्वारे लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जीटीएल प्रकरणाचा सातत्याने पाठपुरावा करीत असल्याने खोटया गुन्हयात अडकवण्याचा कट रचला जात असल्याची शक्यता तक्रारदारांनी व्यक्त केली असून त्यांच्या जिविताला धोका असल्याची भीती त्यांनी मा.मुख्यमत्र्यांना पाठविलेल्या एका निवेदनाद्वारे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जीटीएल आणि महावितरण यांनी संगनमताने केलेल्या १५०० कोटींच्या वीज गैरव्यवहाराप्रकरणी अद्यापपर्यंत चौकशी करण्यात आलेली नसून त्याची कारणे काय आहेत,
(५) असल्यास, सदरहू गैरव्यवहाराची विनाविलंब चौकशी करुन सर्व संबंधित दोषींविरोधात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) अशा आशयाची तक्रार सन २०१५ मध्ये प्राप्त झालेली आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) प्राप्त तक्रार अनुषंगाने महावितरण कंपनीकडून चौकशी करण्यात आली आहे.
(५) महावितरण कंपनीअंतर्गत त्रिसदस्यीय समितीने केलेल्या चौकशीचा अहवाल शासनास प्राप्त झाला असून तो विचाराधीन आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वडूज (ता.खटाव, जि.सातारा) येथील चैतन्य ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेच्या ठेवीदारांच्या ठेवी परत करण्याबाबत

**(१५) * १२९४०६ श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडूज (ता.खटाव, जि.सातारा) येथील चैतन्य ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेच्या ठेवीदारांच्या ठेवी परत मिळत नसल्यामुळे ठेवीदारांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संस्थेच्या चालक व संचालक यांच्यावर तक्रारी करुनही कार्यवाही होत नसल्यामुळे त्याच्या निषेधार्थ सर्व ठेवीदारांनी खटाव तहसील कार्यालयावर माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान मोर्चा काढला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी दखल घेऊन शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर संस्थेवर कारवाई करण्याबाबत तसेच ठेवीदारांच्या ठेवी परत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) व (२) होय.

(३) संस्थेचे सन २०१६-१७ व सन २०१७-१८ या कालावधीचे लेखापरिक्षण करण्याकरीता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८१ नुसार श्री.एस.पी.टकले, लेखापरिक्षक श्रेणी-१, सहकारी संस्था, कोरेगाव यांची अनुक्रमे दिनांक २६.१०.२०१८ व दिनांक ६.८.२०१८ रोजीच्या आदेशान्वये नियुक्ती करण्यात आलेली आहे.

तसेच संस्थेचे कामकाज बंद असून संचालक मंडळ कामकाज करीत नसल्याची खात्री झाल्याने व संस्थेतील ठेवीदारांच्या तक्रारींच्या अनुषंगाने अधिनियमाच्या कलम ७७ नुसार संस्थेवर दिनांक ८.८.२०१८ रोजीच्या आदेशान्वये सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, खटाव यांचे अध्यक्षतेखाली प्रशासक मंडळाची नियुक्ती करण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत या प्रशासक मंडळावर ठेवीदारांचे ७ प्रतिनिधी सदस्य म्हणून कार्यरत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दौंड (जि.पुणे) तालुक्यातील विद्युत रोहित्रांच्या चोरीच्या प्रमाणात झालेली वाढ

**(१६) * १३४०६० श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड (जि.पुणे) तालुक्यातील विद्युत रोहित्रांच्या चोरीच्या घटनांमध्ये माहे जून, २०१८ ते ऑक्टोबर, २०१८ या काळात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याची बाब दि. २५ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इन्फ्रा २ नंतर कोणतीही योजना न आल्यामुळे शेतकरी व नागरिकांना विद्युत रोहित्र मिळण्यासाठी विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त चोरीच्या घटनांची चौकशी केली आहे काय, चौकशीत दोषी आढळून आलेल्यांवर कारवाई करण्याबाबत व उक्त चोरीला गेलेल्या ठिकाणी रोहित्र पुन्हा बसवण्याबाबत महावितरणने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) उक्त घटनांची महावितरणमार्फत चौकशी करण्यात आली आहे. चोरीला गेलेल्या रोहित्रांची फिर्याद संबंधित पोलीस स्टेशनला दाखल करण्यात आली आहे. तसेच दौंड तालुक्यात माहे जून, २०१८ ते ऑक्टोबर, २०१८ चोरीला गेलेल्या एकूण ३८ रोहित्रांपैकी ३२ रोहित्रांच्या ठिकाणी रोहित्रे बसविण्याची कार्यवाही पूर्ण झाली असून उर्वरित रोहित्रांच्या ठिकाणी रोहित्र बसविण्याची कामे प्रगतीपथावर आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बामणवाडा (ता.राजुरा, जि.चंद्रपूर) ग्रामपंचायत परिसरातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची जागा भुमाफियांनी परस्पर विकल्याबाबत

**(१७) * १३२६९५ ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजुरा (जि.चंद्रपूर) तालुक्यातील बामणवाडा ग्रामपंचायत परिसरातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची जागा भुमाफीयांना परस्पर विकण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जागेवर अतिक्रमण करुन ले-आऊट धारकांना कोणतीही परवानगी नसतांना हस्तांतरणाची कार्यवाही नियमबाह्य पद्धतीने खरेदी-विक्री करुन सुरु केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, ले-आउट मंजुरी नसतांना आदिवासीच्या जमिनी गैरआदिवासी धारकांना विकल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर भुमाफीयांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या सहा प्लॉटची खरेदी-विक्री खाजगी व्यक्तींना करुन दिली असून सदर जागेवर अतिक्रमण करुन बांधकाम देखील करुन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर संपुर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने सदर भुमियांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे नाही.

(२), (३), (४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खालापूर (जि.रायगड) तालुक्यातील आदिवासी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम देण्याबाबत

**(१८) * १२९१४५ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खालापूर (जि.रायगड) तालुक्यातील सन २०१७-१८ च्या शैक्षणिक वर्षात ४ हजार ५७१ विद्यार्थ्यांचे तर सन २०१८-१९ या वर्षात ५ हजार १३० आदिवासी विद्यार्थी व चालू शैक्षणिक वर्षासाठी ४ हजार ८९३ विद्यार्थ्यांचे अर्ज सुवर्ण महोत्सवी शिष्यवृत्तीसाठी पेण येथील आदिवासी प्रकल्प कार्यालयाकडे सादर करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेतंर्गत विद्यार्थ्यांचे पैसे थेट त्यांच्या बँक खात्यात जमा केले जातात मात्र गत ३ वर्षांपासून ऑनलाईन पद्धतीत अडचणी येत असल्याने विद्यार्थ्यांच्या खात्यात पैसे जमा झालेले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू पैसे विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा झालेले नाही याविषयी विचारणा केली असता जिल्हयातील विद्यार्थ्यांचे जवळपास १३ कोटी रूपये माहे मार्च २०१८ मध्येच जिल्हा परिषदेकडे वर्ग केले असल्याचे पेण येथील आदिवासी प्रकल्प कार्यालयाने स्पष्ट केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या गैरव्यवहाराप्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून त्यांच्या विरोधात कारवाई करण्याबाबत तसेच शिष्यवृत्तीची रक्कम संबंधित विद्यार्थ्यांना विनाविलंब अदा होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

सन २०१७-१८ या वर्षाकरीता सुवर्ण महोत्सवी शिष्यवृत्ती योजनेचा निधी जिल्हा परिषदेकडे वर्ग केला असून शिष्यवृत्ती परस्पर लाभार्थी विद्यार्थ्यांना देण्याबाबत जिल्हा परिषदेस सुचना दिलेल्या आहेत. तसेच सन २०१८-१९ या वर्षापासून सदर योजना दिनांक १७.४.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये ग्रामविकास विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आली आहे. त्यामुळे सुवर्ण महोत्सवी योजनेचे अर्ज प्रकल्प कार्यालयाकडे प्राप्त होत नाही.

सदरचा निधी हा सन २०१५-१६, सन २०१६-१७ व सन २०१७-१८ या तीन वित्तीय वर्षाचा असून तो त्या त्या वर्षीच शासनाच्या आदेशान्वये जिल्हापरिषदेकडे वर्ग करणेत आलेला आहे व जिल्हा परिषदेने शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांचे खातेवर जमा केलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सावनेर (जि.नागपूर) येथील सहकारी शेतकी खरेदी विक्री मर्या. या संस्थेला तुर व मका खरेदीच्या अनुषंगिक खर्चाची व कमिशनची रक्कम मिळण्याबाबत

**(१९) * १३३९३५ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावनेर (जि.नागपूर) येथील सहकारी शेतकी खरेदी विक्री मर्यादित सावनेर या संस्थेला हंगाम सन २०१६-१७ मधील तुर खरेदीच्या अनुषंगिक खर्चाची व कमिशनची रक्कम तसेच सन २०१७-१८ मधील मका खरेदीवरील अनुषंगिक खर्चाची रक्कम अद्यापही अदा करण्यात आली नसल्याने थकीत रक्कम तातडीने सदर संस्थेस देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरिटिव्ह मार्केटींग फेडरेशन लि. मुंबई यांना दिनांक ४ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर थकीत रक्कम अद्यापही संस्थेस देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर थकीत रक्कम संस्थेला अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय.

(२) व (३) हंगाम २०१६-२०१७ मध्ये सहकारी शेतकी खरेदी विक्री संस्था, मर्या.सावनेर या संस्थेने तूर खरेदीच्या अनुषंगिक खर्चाची व कमिशनची रक्कमेसाठी संस्थेने प्रस्तावित केलेल्या रुपये ६६.५९ लाख रुपयेपैकी रुपये ४५.८१ लाख संस्थेस अदा करण्यात आले असून, उर्वरित रक्कम नाफेडकडून खर्चाची रक्कम अंतिम होऊन निधी प्राप्त होईल, तद्नंतर संस्थेस अदा करण्यात येईल.

हंगाम २०१७-२०१८ मधील संस्थेना केलेल्या मका खरेदीच्या अनुषंगिक खर्चाचा प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर संस्थेस रक्कम अदा करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चाकण (ता.खेड, जि.पुणे) औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र.५ साठी भूसंपादनाची कार्यवाही सुरु करण्याबाबत

**(२०) * १३४०७९ श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने चाकण औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र.५ साठी सन २००७ मध्ये मौजे चाकण, रोहकल, आंबेठाण, वाकी, गोणवडी तसेच बिरदवडी या गावातील जमिनींवर संपादनासाठी “महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या भूसंपादनासाठी राखीव” असे शेरे मारले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १५ डिसेंबर, २०१५ रोजी कलम ३२ (२) ची कार्यवाही सुरु होवून तसेच दिनांक २१ मे, २०१८ च्या उच्चाधिकार समितीच्या ९३ व्या बैठकीत मुल्यांकन दर निश्चित होवूनही अद्यापपर्यंत भूसंपादनाची कार्यवाही सुरु न झाल्याने शेतकऱ्यांनी दिनांक १५ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास प्रादेशिक कार्यालय, पुणे येथे ठिय्या आंदोलन केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २३ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.उद्योग मंत्री यांना लेखी निवेदन देवून भूसंपादनाची

कार्यवाही तात्काळ सुरु करावी अन्यथा वर्षानुवर्षे शेतकऱ्यांच्या जमिनीवर असलेले शिक्के काढुन टाकावे अशी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३), (४) व (५) हे खरे आहे.
त्याअनुषंगाने भूसंपादनाची पूढील प्रक्रिया सूरू आहे.

-----------------

## राज्यातील पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेणा-या मागासवर्गीय विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीची रक्कम अदा करण्याबाबत

**(२१) * १३२२२१ श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीची रक्कम तातडीने अदा करण्याची व त्यांना मिळणाऱ्या २ हजार २५० रुपयांच्या शिष्यवृत्तीमध्ये १२ हजार रुपयांपर्यंत वाढ करण्याची मागणी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने दिनांक ३० ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास शासनाने केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, सदर मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अंधेरी (पूर्व) येथील मरोळ औद्योगिक वसाहतीमधील भूखंड निविदा न काढता वाटप केल्याबाबत

**(२२) * १३२७८१ श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अंधेरी (पूर्व) मरोळ औद्योगिक वसाहतीमधील x-२३ हा भूखंड निविदा न काढताच मे.नवनीत मोटर्स यांना वाटप करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भूखंडाच्या शेजारील x-२२ हा भूखंड प्रती चौरस मीटर १ लाख ५६ हजार या दराने M/S. GHV Hospitality Pvt. Ltd. यांना नुकताच वाटप केला असून x-२३ हा भूखंड प्रती चौरस मीटर ५४ हजार इतक्या कमी दराने वाटप करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या धोरणानुसार मरोळ औद्योगिक वसाहतीतील भूखंड हे व्यावसायिक वापराकरिता निविदा मागवून वितरित केले जात असतानाही, मे.नवनीत मोटर्स यांना फायदा पोहचविण्यासाठी सदर भूखंड औद्योगिक वापराकरिता वितरीत केल्यामुळे x-२३ या भूखंडाच्या वाटपामध्ये अनियमितता होऊन महामंडळास तोटा निर्माण झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर अनियमिततेमध्ये दोषी आढळून आलेल्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे नाही.

(२), (३), (४) व (५) हे खरे नाही.

मरोळ औद्योगिक वसाहतीमधील एक्स-२३ क्षेत्र २६०७.४५ चौ.मी. चे वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन निविदा पध्दतीने उच्चतम दर असलेल्या रुपये ५६६६६/- प्रति चौ.मी. नवनीत मोटर्स प्रा.लि. यांना वाटप आदेश दिनांक २०/०५/२०१६ वाटप करण्यात होता. तथापि, मे. नवनीत मोटर्स प्रा.लि. यांनी मागणी केल्यानुसार सदर भूखंडालगतचे असलेले अतिरिक्त क्षेत्र ५५७.३१ चौ.मी. असे एकूण ३१४६.७६ चौ.मी. इतके क्षेत्र निविदेतील दरानुसार व महामंडळाच्या मार्गदर्शक तत्वानुसार भूखंडाचे वाटप करण्यात आले आहे. एक्स-२२ हा भूखंड व्यापारी दराने भूखंड वाटप केला आहे. तसेच एक्स-२३ हा भूखंड औद्योगिक दराने वाटप करण्यात आला आहे. महामंडळाचे व्यापारी व औद्यौगिक दर वेगवेगळे आहेत.

-----------------

## सोलापूर जिल्ह्यातील महावितरण कंपनीची कामे निधी अभावी प्रलंबित असल्याबाबत

**(२३) * १३०७६३ श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यात महावितरण कंपनीकडून मंजूर असलेली कामे निधी उपलब्ध होत नसल्यामुळे प्रलंबित असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माढा, पंढरपूर, माळशिरस व करमाळा तालुक्यामध्ये सन २०१२-१३ ते २०१७-१८ या कालावधीत मंजूर असलेली डीपी उभारणी, वीज जोडणी देण्याची कामे प्रलंबित असून सदर कामे करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी वारंवार करत आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, तद्नुसार तालुकानिहाय मंजूर असलेल्या कामाची संख्या व सद्य:स्थिती काय आहे,

(४) तसेच मंजूर असलेली कामे पुर्ण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) सन २०१२-१३ ते २०१७-१८ या कालावधीत विविध योजनेअंतर्गत उभारण्यात आलेले नवीन वितरण रोहित्रे व वीज जोडण्यांची संख्या तालुकानिहाय खालीलप्रमाणे:-

नवीन वितरण रोहित्रे- माढा-९३५, पंढरपूर-१११५, माळशिरस-१८१३, करमाळा-१०८३

नवीन वीज जोडण्या- माढा-१८०७४, पंढरपूर २७८२३, माळशिरस २४९३७, करमाळा १४७७८.

याशिवाय माढा तालुक्यात ११, पंढरपूर तालुक्यात ७, माळशिरस तालुक्यात २, व करमाळा तालुक्यात ७, ३३/११ के.व्ही उपकेंद्र कार्यान्वित करण्यात आली आहेत.

(४) उच्चदाब वितरण प्रणाली अंतर्गत कृषीपंप वीज जोडण्याकरिता कामांचे कार्यादेश देण्याची प्रक्रिया सुरु आहे. तसेच जिल्हा वार्षिक योजना व विशेष घटक योजना अंतर्गत मंजूर कामे करण्यासाठी निविदा प्रसिध्द करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भोकर (ता.जि.नांदेड) येथील ग्राहकांच्या वीज देयकांमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२४) * १२८८८५ श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोकर (ता.जि.नांदेड) येथील ग्राहकांच्या वीज देयकांमध्ये गैरव्यवहार झाल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भोकर येथील महावितरणच्या कार्यालयात कार्यरत असलेल्या कर्मचा-यांनी संगनमत करुन दिनांक १ जानेवारी, २०१६ ते माहे मार्च, २०१८ या कालावधीत पदावर कार्यरत असतांना ग्राहकांची आवश्यक कागदपत्रे न घेता वीज जोडणी, वीज ग्राहकांच्या खोटया व बनावट पावत्या तयार करुन आर्थिक गैरव्यवहार व चुकीचे वीज देयक नसताना स्वत:च्या फायदयासाठी देयकातुन रक्कम वजा करणे अशा विविध प्रकारे महावितरण कंपनीची सुमारे २६ लाख रुपयांची फसवणुक केली असून या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, त्यात काय निदर्शनास आले, त्यानुसार संबधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.
(२) महावितरण कंपनीकडून प्राथमिक चौकशी करण्यात आली आहे.
(३) चौकशीच्या अनुषंगाने संबंधित सात दोषी अधिकारी व कर्मचारी यांना निलंबित करण्यात आले असून संबंधितांवर भोकर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हिंगणघाट (जि.वर्धा) तालुक्यातील टॉवर बांधकामामध्ये बाधित झालेल्या शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला देण्याबाबत

**(२५) * १३२३४२ श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगणघाट (जि.वर्धा) तालुक्यात टॉवर उभारणा-या कंपनीने शेतक-यांच्या शेतात टॉवर उभारणीचे काम करीत असताना शेत मालकाला पहिल्या टप्प्याची मोबदला रक्कम दिल्याशिवाय व करारनामा न केल्याशिवाय पुढच्या टप्प्याचे काम करू नये असा शासनाचा स्पष्ट आदेश असताना स्थानिक जिल्हा प्रशासनाने कंपनीला पुढील टप्प्याचे काम सुरू करण्यास परवानगी दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टॉवर बांधकाम करणा-या कंपनीने संपूर्ण काम झाल्यानंतरही मोबदला दिला नसल्याची तक्रार शेतमालकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यात काय निदर्शनास आले आहे,

(४) असल्यास, त्यानुसार बाधित शेतक-यांना मोबदला देण्याबाबत व टॉवर कंपनीवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे** : (१) व (२) केंद्र शासनाच्या परवानगीने रायपूर-वरोरा ट्रान्समिशन लि. या कंपनीमार्फत ७६५ के.व्ही. राजनंदगाव-वरोरा वाहिनीचे वर्धा जिल्हयातील हिंगणघाट व समूद्रपूर तालुक्यात काम सुरु आहे. शासन निर्णय दिनांक ३१.०५.२०१७ नुसार भूधारकांना टप्प्या टप्प्याने मोबदला देण्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाकडून सदर कंपनीस कळविण्यात आले आहे. त्याचप्रमाणे सदर कंपनीकडून मोबदला कमी मिळाला असून, तो जास्त मिळण्यासाठी भूधारकांच्या तक्रारी जिल्हाधिकारी, वर्धा यांना प्राप्त झाल्या आहेत. यासंदर्भात शासकीय नियमानुसार तपासणी करुन योग्य तो मोबदला देण्याबाबत जिल्हाधिकारी, वर्धा यांच्याकडून रायपूर-वरोरा ट्रान्समिशन लि. कंपनीस कळविले आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दाभोळ व पांगारी परिसरात (ता.दापोली, जि.रत्नागिरी) विज पुरवठा सुरळीत करण्याबाबत

**(२६) * १३३४१० श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दाभोळ व पांगारी परिसरात (ता.दापोली, जि.रत्नागिरी) विज पुरवठा खंडीत झाल्याने याचा जाब विचारण्यासाठी ग्रामस्थ महावितरणच्या कार्यालयात गेले असता, त्यांच्यावर सरकारी कामात अडथळा आणल्याचा गुन्हा नोंदविल्याचे दिनांक ६ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, फणसू उपक्रेद्रातंर्गत हा भाग येत असल्याने गेली चार दिवस या भागातील विज पुरवठा खंडीत असून इतर परिसरात मात्र विजपुरवठा सुरळीत सुरु असल्याने याची विचारणा करण्यासाठी ग्रामस्थ गेले असता त्यांचेवर उक्त गुन्हा दाखल केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निदर्शनास आले व त्यानुषंगाने दाभोळ व पांगारे येथे वीज पुरवठा सुरळीत करण्याबाबत तसेच ग्रामस्थांवर दाखल केलेला गुन्हा मागे घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) रत्नागिरी जिल्यातील दापोली तालुक्यातील दाभोळ व पांगारी येथील ३३/११ के. व्ही. फणसु उपकेंद्राहून ११ के.व्ही. दाभोळ फिडरवर दि. २ ऑक्टोंबर २०१८ रोजी झाडे पडल्यामुळे विद्युत तारा तुटून पडल्या होत्या. टेंमकरवाडी परिसर वगळून इतर परिसरातील वीजप्रवाह चालू करण्यात आला होता. या कारणामुळे ज्या परिसरातील वीजप्रवाह बंद होता, त्या परिसरातील विद्युत ग्राहकांचा जमाव ३३/११ के. व्ही. फणसू उपकेंद्रात दाखल झाला. सदर जमावाने तेथे उपस्थित असलेल्या ऑपरेटवर दबाव आणून आमचा वीजप्रवाह बंद असल्यामुळे इतर भागातील चालू असलेला वीजप्रवाह बंद करण्यात यावा असा हट्ट धरला.

तसेच ऑपरेटरला दमदाटी करुन, त्याच्यावर दबाव आणून ज्या भागात विद्युत पुरवठा चालू होता तो पण  बंद करण्यास भाग पडले. म्हणून नाईलाजास्तव दाभोळ व पांगारी या परिसरातील काही ग्रामस्थांवर संबंधित पोलीस स्टेशन मध्ये दि. ०३ ऑक्टोबर, २०१८ रोजी महावितरण कंपनीमार्फत गुन्हा (F.I.R. no.१८०) नोंदविण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाड (जि.रायगड) क्षेत्रातील व्यापाऱ्यांकडून दोनदा बाजार शुल्क वसुल न करण्याबाबत

**(२७) * १३२८८७ श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) अधिनियम, २०१७ अन्वये अधिनियमात परिशिष्ट १८ नुसार विहित करण्यात आलेल्या देयकाच्या नमुना परिपत्रकात बाजार शुल्क भरल्याचे देयक कृषि उत्पन्न बाजार समितीस सादर करण्यात आले तर संबंधित व्यापाऱ्यांकडून बाजार शुल्क वसुल करण्यात येऊ नये, अशी तरतूद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, असे असतांनाही शासनाच्या जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, रायगड-अलिबाग यांच्या कार्यालयाकडून महाड परिसरातील व्यापाऱ्यांकडून त्यांनी परिशिष्ट-१८ च्या नमुन्यात देयक सादर करण्यात आल्यानंतरही त्यांच्याकडून पुन्हा बाजार शुल्क घेण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाड क्षेत्रातील व्यापाऱ्यांकडून दुबार शुल्क वसुल करण्यात येत असल्याबाबत महाड शहर किराणा व्यापारी असोसिएशनने मा.सहकार मंत्री यांना दिनांक १ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास पत्रव्यवहार करुनही अदयाप कोणतीच कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार उपरोक्त प्रकरणी दोनदा बाजार शुल्क वसूल न करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख** : (१) होय.

महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम ३१ आणि नियम १७, १८ व ३३ अन्वये व्यापाऱ्यांकडून बाजार शुल्क भरण्याचे देयक कृषि उत्पन्न बाजार समितीस सादर करण्यात आले तर संबंधित व्यापाऱ्यांकडून बाजार शुल्क वसूल करण्यात येऊ नये अशी तरतुद आहे.

(२) नाही.

महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम ३१ आणि नियम १७, १८ व ३३ मधील तरतुदी व त्याच्या अंमलबजावणी बाबत पणन संचालनालयाचे परिपत्रक दिनांक २०.१०.२०१६ नुसार व्यापाऱ्यांनी परपेठेतील बाजार समितीने वसुल केलेल्या बाजार शुल्काची पावती बाजार समितीस सादर करणे आवश्यक आहे. परंतु महाड येथील व्यापारी बाजार शुल्काची पावती सादर करत नसल्याने त्यांचेकडून बाजार शुल्क आकारण्यात येत आहे.

(३) नाही.

महाड कृषि उत्पन्न बाजार समिती करीत असलेल्या सेस वसुली बाबत आवश्यक ती सर्व चौकशी पूर्ण करून महाड व्यापारी असोसिएशन चे अध्यक्ष व अन्य तक्रारदार यांना जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड यांनी लेखी उत्तर देण्यात आले आहे.

(४) नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धामणगाव बढे (ता.मोताळा, जि.बुलढाणा) येथील ११ केव्हीची विद्युत वाहिनी स्थलांतरीत करणेबाबत

**(२८) * १२८४३२ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धामणगाव बढे (ता.मोताळा, जि.बुलढाणा) येथील वीज पुरवठ्यासाठी गावाच्या मध्यभागी व रहिवाशी वस्तीवरून ११ केव्हीची विद्युत वाहिनी गेली असल्याने स्थानिक नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होण्याची शक्यता आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त वाहिनी गावाबाहेर स्थलांतरित करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १७ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास महावितरण कंपनी मलकापूर (जि.बुलढाणा) यांना दिलेले निवेदन शासनास प्राप्त झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे, चौकशीत काय निष्पन्न झाले, त्यानुसार सदर विद्युत वाहिनी स्थलांतरित करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

११ के.व्ही. धामणगांव वीज वाहिनी गावाच्या मध्यभागातून गेलेली असून सदर वाहिनीखाली गावातील लोकांनी घर बांधणी करुन रहिवासी वस्ती केलेली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) धामणगांव बढे येथील लोक वस्तीतून गेलेल्या ११ के.व्ही. वीज वाहिनीचे सर्वेक्षण करण्यात येऊन १.०८ कि.मी. लांब ११ के.व्ही वीज वाहिनी गावाबाहेर स्थलांतरीत करणेबाबतचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. त्याची किंमत रु. ६.९३ लक्ष असून सदर काम जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत

प्रस्तावित करण्यात आले आहे. सदर कामास प्रशासकीय मान्यता तसेच आवश्यक निधी प्राप्त झाल्यानंतर, सदरचे काम प्राधान्याने पूर्ण करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पांढरकवडा (ता.केळापूर, जि.यवतमाळ) येथील आदिवासी आश्रमशाळांमध्ये पाठ्यपुस्तकाचे वाटप करण्याबाबत

**(२९) * १३३६७७ डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पांढरकवडा (ता.केळापूर, जि.यवतमाळ) येथील आदिवासी आश्रमशाळेमध्ये शिक्षण घेणा-या इयत्ता नववी मधील ४५० विद्यार्थी आणि इयत्ता अकरावीमधील ३०० विद्यार्थांना अजूनपर्यंत पाठयपुस्तकाचे वाटप झाले नसल्याचे दिनांक २३ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले,

(३) असल्यास, विद्यार्थ्यांना पाठ्य पुस्तकाचे वाटप करण्यास विलंब करणा-यांवर कारवाई करण्याबाबत व वाटप वेळेवर होण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे नाही.

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पांढरकवडा ता.केळापूर, जि.यवतमाळ यांच्या कार्यक्षेत्रांतर्गत एकूण १७ शासकीय आश्रमशाळा कार्यरत असून सदर आश्रमशाळांमध्ये सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात एकूण ३४४२ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यापैकी इयत्ता ९ वी मध्ये एकूण ७२५ विद्यार्थी व इयत्ता ११ वी मध्ये (कला व विज्ञान) एकूण ४७३ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

शासकिय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांचा पुरवठा करण्याबाबत प्रकल्प अधिकारी, पांढरकवडा यांच्याकडून कार्यवाही करण्यात आली असून प्रकल्पांतर्गत असणा-या सर्व १७ शासकीय आश्रमशाळांमध्ये पाठ्यपुस्तके वाटप करण्यात आले आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आदिवासी विकास महामंडळाने खरेदी केलेली तूर खराब झाल्याबाबत

**(३०) * १३३०६३ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास महामंडळाने शेतकऱ्यांकडून सन २०१५ मध्ये यवतमाळ आणि किनवट परिसरात ६२०० क्विंटल, धारणी परिसरात १० हजार २०० क्विंटल, नंदुरबार परिसरात १२०० क्विंटल या प्रमाणे १७ हजार २०० क्विंटल तुरीची खरेदी करून गोदामात ठेवण्यात आली असता अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्यामूळे हजारो क्विंटल तुरीला मोठया प्रमाणात कीड लागलेली असल्याने सर्व तूर खराब झालेली असल्याची माहिती दिनांक १५ ऑक्टोंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे शासनाला कोट्यवधी रूपयांचे नुकसान झालेले असुन उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार संबधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे व त्याचा तपशिल काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१), (२) व (३) सद्य:स्थितीत सन २०१५-१६ मध्ये यवतमाळ व किनवट परिसरात ६७३२.४२ क्विंटल, धारणी परिसरात ८१५४.१८ क्विंटल व नंदुरबार परिसरात १२७६.५९ क्विंटल तूर शिल्लक आहे. सदर

तुरीस वेळोवेळी धुरीकरण व औषधांची फवारणी करण्यांत येत आहे. तूर खरेदीचा कालावधी ३ वर्षावर झाल्याने तुरीला काही प्रमाणात किड लागलेली आहे. उर्वरित तुरसाठा खराब होऊ नये म्हणून धुरीकरण व किटकनाशक फवारणी वेळोवेळी करण्यांत येत आहे.

साठवणूक केलेल्या तुरीची विक्री ई-लिलावाद्वारे करण्याचे प्रयत्न करण्यात आलेले आहेत. परंतु BEP दरपपेक्षा कमी दर आल्याने विक्री होऊ शकली नाही. दि.१४.०९.२०१८ व दि.२०.०९.२०१८ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत संचालकांनी समिती नियुक्त करण्याचा प्रस्ताव पारीत केलेला आहे. सदर समितीने अंतिम केलेल्या दराने विक्री करण्याबाबत निर्णय घेऊन संपूर्ण तुरीची विक्री करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत झालेला गैरव्यवहार

**(३१) * १३३५३९ श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत खातेदारांना खातेपुस्तक देताना जमा केलेली रक्कम बँकेत जमा न केल्यामुळे गत दोन वर्षात ३३ लाख रुपये इतक्या रकमेचा गैरव्यवहार झाला असल्याचे दिनांक २२ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गैरव्यवहाराची रक्कम ही शाखा अधिकाऱ्यांच्या वेतनातून वसूल करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) श्री.संजय पाटील दुधगावकर व सर्व सदस्य शेतकरी संघर्ष समिती उस्मानाबाद यांनी अशा प्रकारचा तक्रार अर्ज जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांना दिनांक २३/१०/२०१८ रोजी दिला आहे.

(२), (३) व (४) सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने दिनांक २६/१०/२०१८ रोजी जिल्हा विशेष लेखा परीक्षक वर्ग-१, सहकारी संस्था, उस्मानाबाद यांना चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत. चौकशी अहवाल प्राप्त झाल्यावर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अहेरी (जि.गडचिरोली) येथील आदिवासी आश्रमशाळेमध्ये साहित्य पुरवठ्यामध्ये झालेला गैरव्यवहार

**(३२) * १२८७३० श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.वैभव पिचड (अकोले), डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहेरी (जि.गडचिरोली) येथील आदिवासी आश्रमशाळेमध्ये साहित्य पुरवठ्यामध्ये गैरव्यवहार झाला असल्याने १) श्वेता एंटरप्राइजेस, अमरावती २) महिला गृह उद्योग, सटाणा ३) सोनु मोनु इंडस्ट्रिज, नागपूर ४) केंद्रीय भंडार, पुणे ५) शिवम मिल्क ॲड सप्लायर्स या पाच पुरवठादार संस्थाच्या संचालकांविरूध्द गुन्हे दाखल करण्यात आले असून प्रकल्प अधिका-यांनी या गैरप्रकारांची चौकशी करण्याचे आदेश दिल्याचे दिनांक १० ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चौकशीमध्ये सन २०१६-१७ व २०१७-१८ या वर्षामध्ये उक्त संस्थाना किराणा, फळे, अन्नधान्य पुरवठा करण्याकरिता कंत्राट देण्यात आले होते मात्र पुरवठादारांनी नोंदवही, पुरवठा केलेल्या साहित्याच्या पावत्या, अप्पर आयुक्त, आदिवासी विभाग, नागपूर यांच्याकडे सादर केल्या असता पावत्यांमध्ये तफावत दिसून आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या गैरव्यवहाराची चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबधित पुरवठादारांवर व गैरव्यवहारात

सहभागी असणाऱ्या विभागाच्या अधिका-यांवर कारवाई करण्याबाबत व असे गैरप्रकार होऊ नयेत याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१), (२), (३) व (४) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अहेरी अंतर्गत ११ शासकीय आश्रमशाळा कार्यरत असून माहे एप्रिल-मे, २०१८ दरम्यान अन्नधान्य, कडधान्य, किराणा साहित्य पुरवठ्यामध्ये अनियमितता दिसून आल्याने माहे मे, २०१८ मध्ये केलेल्या तपासणीत अन्नधान्य, कडधान्य, किराणा साहित्यांमध्ये पोहच पावत्यांमध्ये अफरातफर केल्याचे निदर्शनास आले. त्यानूसार प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अहेरी यांनी १) श्वेता एटंरप्राइजेस, अमरावती २) महिला गृह उद्योग, सटाणा ३) सोनु मोनु इडंस्ट्रिज, नागपूर ४) केंद्रीय भंडार, पुणे ५) शिवम मिल्क अँड सप्लायर्स या पाच पुरवठादारावर पोलिस स्टेशन, अहेरी येथे गुन्हे दाखल केले आहेत. सदर प्रकरणी पोलीस तपास सुरू आहे. तसेच असा प्रकार पुन्हा होवू नये या करिता अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर यांनी दिलेल्या निर्देशान्वये अन्नधान्य पुरवठा मासिक अहवाल शासकीय आश्रमशाळांवरून प्राप्त करून दर महिना प्रकल्प कार्यालयामार्फत अपर आयुक्त, कार्यालयाकडे पाठविण्यात येतो. शासनाने सदर प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन दि.२४/९/२०१८ रोजीच्या पत्रान्वये आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांना सर्व शासकीय आश्रमशाळांना मागील तीन वर्षात पुरवठा करण्यात आलेल्या अन्नधान्य, कडधान्य, किराणा माल, मसाले, दूध व फळे, तसेच शैक्षणिक साहित्य व इतर सर्व प्रकारच्या पुरवठा करण्यात आलेल्या वस्तुंबाबत प्रत्यक्ष आश्रमशाळांना/विद्यार्थ्यांना सदर वस्तुंचा पुरवठा झाल्याबाबत/वस्तु ताब्यात मिळाल्याबाबत तसेच संबंधीत मुख्याध्यापकांनी दिलेल्या पोच पावत्या व त्याअनुषंगाने या वस्तुंच्या पुरवठादारांकडून संबंधित प्रकल्प अधिकारी/अपर आयुक्त यांच्याकडे सादर करण्यात आलेली देयके/पोच पावत्या यांची आपसामध्ये पडताळणी करण्यासाठी अपर आयुक्त, स्तरावर विशेष पथके तयार करण्याच्या सुचना दिल्या आहेत.

सदर पथकांमार्फत शासकीय आश्रमशाळांना अचानक भेटी देऊन विहित केलेला पुरवठा होत असल्याचे व मेनूप्रमाणे विद्यार्थ्यांना सर्व वस्तु/साहित्य मिळत असल्याची खात्री करून तपासणीमध्ये तफावत आढळल्यास अपर आयुक्तांनी संबंधीतावर तातडीने शिस्तभंग विषयक कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयुक्त व शासनास सादर करण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्यानूसार आश्रमशाळांची पुरवठ्याच्या अनुषंगाने तपासणी करण्यात येत आहे.

-----------------

## गुळवंच व मुसळगांव (ता.सिन्नर, जि.नाशिक) येथील इंडिया बुल्स या कपंनीकडून मुद्रांक शुल्क वसूल करण्याबाबत

**(३३) * १२८३२४ श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुळवंच व मुसळगांव (ता.सिन्नर, जि.नाशिक) येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या माध्यमातून १,०४७ हेक्टर जमिन संपादीत करण्यात आली असून, या जागेच्या खरेदी व्यवहारात संबंधित शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारचे मुद्रांक शुल्क भरावे लागले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औद्योगिक विकास महामंडळाने सदर जमिन इंडिया बुल्स या कंपनीला ९५ वर्षाच्या भाडेपट्टयाने दिली असतांना इंडिया बुल्स कंपनीने १ कोटी ८० लक्ष रुपयांचे मुद्रांक शुल्क भरणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, इंडिया बुल्स या कंपनीने उक्त मुद्रांक शुल्क न भरल्याने, तलाठ्याने सदर शुल्क महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास जागा देणाऱ्या २० गटातील शेतकऱ्यांच्या ७/१२ उताऱ्यावर टाकले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने इंडिया बुल्स या कपंनीकडून मुद्रांक शुल्क वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) होय, हे खरे आहे.

(२) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने मे. इंडीया बुल्स इंडस्ट्रीयल इंन्फ्रास्ट्रक्चर लि.यांना ता. सिन्नर, जिल्हा-नाशिक येथील ताब्यात घेतलेल्या ११८५.७ हे. आर. इतक्या क्षेत्रापैकी १०४७.८२ हे. आर. इतके क्षेत्र बहुउद्यदेशीय विशेष आर्थिक क्षेत्र विकसित करण्यासाठी वाटप केले आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व मे. इंडीया बुल्स इंडस्ट्रीयल इंन्फ्रास्ट्रक्चर लि.ता. सिन्नर, जिल्हा-नाशिक यांच्या संयुक्त भागीदारी कंपनीमार्फत सदर विशेष आर्थिक क्षेत्र विकसित करण्यात येत आहे.

राज्य शासनाने दिनांक १२/१०/२००१ च्या शासन निर्णयान्वये राज्याचे विशेष आर्थिक क्षेत्र धोरण जाहीर केले आहे. व त्या धोरणात विशेष आर्थिक क्षेत्र विकसित करण्यासाठी स्थापित करणाऱ्या विकासक/ सहविकासक व उद्योग घटकांना जमिनीच्या प्रथम खरेदीवर / भाडेपट्टयावर मुद्रांक शुल्क व नोंदणी फी माफीची सवलत अनुज्ञेय आहे.

(३) जिल्हाधिकारी, नाशिक (मुद्रांक) यांच्या दिनांक ७/०७/२०१८ च्या आदेशान्वये तलाठी, गुळवंच यांनी एकूण ३६ गटावर रु. १ कोटी ८० लाख इतका मुद्रांक शुल्क थकबाकीचा बोजा ७/१२ च्या उताऱ्यावर दाखल केला होता.

(४) सह जिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, नाशिक यांच्या दिनांक २६/०९/२०१८ च्या आदेशानुसार तलाठी, गुळवंच यांनी मौजे गुळवंच येथील मे. इंडिया बुल्स लि. कंपनी यांच्या क्षेत्राव्यतिरिक्त इतर खातेदारांच्या मिळकतीवरील बोजाच्या नोंदी कमी करण्यासंबंधीच्या फेरनोंदी केल्या आहेत. तसेच मे. इंडीया बुल्स इंडस्ट्रीयल इंन्फ्रास्ट्रक्चर लि. सिन्नर, जिल्हा-नाशिक यांच्या विरुध्द मुद्रांक अधिनियम, १९५८ नुसार वसूली संबंधीची कार्यवाही जिल्हाधिकारी, नाशिक (मुद्रांक) यांच्याकडून करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कर्जत आणि नेरळ (जि.रायगड) येथील आदिवासी वसतिगृहाचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत

**(३४) * १२८१७२ श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत आणि नेरळ (जि.रायगड) येथे आदिवासी वसतिगृह मंजुर आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नेरळ येथील वसतिगृह गेली १५ वर्षे विनावापर पडून आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कर्जत येथील वसतिगृहाकरिता ४ कोटी रुपयाची तरतूद करुन २ वर्षे झाली तरी अद्याप काम सुरु झालेले नसून याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यात काय निदर्शनास आले, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) होय.

कर्जत (जि.रायगड) येथे आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह व नेरळ येथे आदिवासी मुलां-मुलींचे शासकीय वसतिगृह मंजूर आहे.

(२) व (३) मौजे नेरळ ता.कर्जत येथील न.भु.क्र. २२४ अ येथे मुलींच्या वसतिगृहाची जुनी व मोडकळीस असलेली इमारत पाडण्यात आली आहे. त्याजागेवर आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृहाच्या नवीन इमारतीचे बांधकाम करण्यासाठी जिल्हाधिकारी रायगड यांनी जिल्हा नियोजन समिती योजनेमधून दि.२१.१.२०१६ अन्वये रु.३९९.०० लक्ष किंमतीस प्रशासकीस मंजूरी दिलेली आहे. सदर बांधकाम कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पनवेल यांचेकडून करण्यात येत होते. तद्नंतर आदिवासी विकास विभागाद्वारा आश्रमशाळा व वसतिगृह इमारत बांधकामासाठी स्वतंत्र बांधकाम व्यवस्थापन कक्ष स्थापन करण्यात आला. त्यानंतर सदरचे काम

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम पनवेल यांनी आदिवासी विकास विभागाकडील बांधकाम व्यवस्थापन कक्षाकडे दिनांक २५.१.२०१७ रोजी हस्तांतर केले. सदर अंदाजपत्रकास मुख्य अभियंता, आदिवासी विकास विभाग बांधकाम व्यवस्थापन कक्ष यांनी दिनांक २३.१.२०१८ रोजी तांत्रिक मंजूरी दिली आहे. सदर कामाचे कार्यादेश दिनांक ७.८.२०१८ रोजी देण्यात आलेले आहे.

(४) नेरळ येथील आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह इमारतीचे बांधकाम सुरु आहे. तसेच, कर्जत येथील आदिवासी मुलांचे शासकीय वसितगृहास अद्यापपर्यंत शासकीय जागा उपलब्ध झालेली नाही.

सद्यस्थितीत नेरळ व कर्जत येथील वसतिगृह भाडयाच्या इमारतीत सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धुळे जिल्हयातील एसीपीएम वैद्यकीय महाविद्यालयात बनावट जात वैधता प्रमाणपत्राद्वारे विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती घेतल्याबाबत

**(३५) * १३३२९२ श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्हयातील एसीपीएम वैद्यकिय महाविद्यालयात बनावट जात वैधता प्रमाणपत्राद्वारे एमबीबीएस अभ्यासक्रमासाठी आदिवासी प्रवर्गातून प्रवेश घेतलेल्या नऊ डॉक्टर विद्यार्थ्यांनी बनावट कागदपत्रांद्वारे शिष्यवृत्ती घेऊन शासनाची सुमारे ७७ लाख ३५ हजार ४२७ रूपयांची फसवणूक केल्याचा प्रकार निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चाळीसगाव रोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) होय, हे खरे आहे.

धुळे जिल्हयातील एसीपीएम वैद्यकीय महाविद्यालयातील ९ विद्यार्थ्यांना सन २०१२-१३ ते सन २०१६-१७ या कालावधीत रुपये ७७,३६,२२२/- इतकी शिष्यवृत्ती अदा करण्यात आली होती.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, सन २०१२-१३ ते २०१६-१७ या कालावधीत शिष्यवृत्ती दिलेल्या २९ विद्यार्थ्यांचे जात वैधता प्रमाणपत्र अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती नंदुरबार यांच्याकडे तपासणीसाठी पाठविले असता ९ विद्यार्थ्यांचे जात वैधता प्रमाणपत्र बनावट असल्याचे आढळून आले. ९ विद्यार्थ्यांकडून शिष्यवृत्ती वसूल करण्यात आली असून त्यांचे विरुध्द पोलीस ठाणे, धुळे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## श्री दुधगंगा वेदगंगा सहकारी साखर कारखाना मर्या. बिद्री (ता.कागल, जि.कोल्हापूर) च्या कारखाना प्रशासनाने सभासदांसाठीच्या सवलतीच्या साखरेमध्ये केलेली दरवाढ रद्द करण्याबाबत

**(३६) * १३३१२५ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बिद्री (ता.कागल, जि.कोल्हापूर) येथील श्री दुधगंगा वेदगंगा सहकारी साखर कारखाना प्रशासनाने २८ हजार सभासदांची सवलतीची साखर रुपये १० वरुन रुपये २० अशी केल्याने सदर अन्यायी दरवाढ रद्द करण्याचे निवेदन साखर सह संचालक, कोल्हापूर यांनी दिनांक २४ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कारखाना प्रशासनाने २८ हजार सभासदांची सवलतीच्या साखरेची केलेली अन्यायी दरवाढ रद्द करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय.

(२) होय.

(३) शासनाच्या दि.१४.०२.२००६ च्या पत्रानुसार कारखान्याच्या नियमाप्रमाणे ज्या सभासदांनी कारखान्यास ऊस घातला असेल त्यांनाच सवलतीच्या दरात साखर वितरीत करणेबाबत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९ (अ) अन्वये निर्देश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

उपरोक्त निर्देशानुसार, ज्या सभासदांनी कारखान्यास नियमित ऊस घातला आहे त्यांना दिल्या जाणाऱ्या सवलतीच्या साखरेचा दर प्रती किलो रु.१०/- प्रमाणे यानुसार पूर्वीप्रमाणेच सवलतीच्या दराने साखर वितरीत करण्याचा ठराव कारखान्याच्या संचालक मंडळाच्या दि.३१.०३.२०१८ रोजीच्या संचालक मंडळ सभेमध्ये पारित केलेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## काळुस्ते (ता.इगतपुरी, जि.नाशिक) येथील शासकीय आश्रमशाळेमधील विद्यार्थ्यांना भोजन मिळाले नसल्याबाबत

**(३७) * १३१३२९ श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) काळुस्ते (ता.इगतपुरी, जि.नाशिक) येथील शासकीय आश्रमशाळेमधील विद्यार्थ्यांना माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान भोजना अभावी उपाशी रहावे लागले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आश्रमशाळेत गेल्या ३ वर्षांपासून अधिक्षकांचे पद रिक्त असून शिक्षक व कर्मचारी देखील या आश्रमशाळेमध्ये उपस्थित नसतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले त्यानुसार शासनाने विद्यार्थ्यांना उपाशी ठेवणा-या संबंधितांविरुध्द कारवाई करण्याबाबत व अधिक्षकांची त्वरित नियुक्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) व (२) हे खरे नाही.

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नाशिक यांच्या कार्यक्षेत्रांतर्गत शासकीय आश्रमशाळा काळुस्ते, ता.इगतपूरी, जि.नाशिक आहे. आदिवासी विकास विभाग व टाटा ट्रस्ट यांचे संयुक्त भागीदारीतुन मौजे मुंढेगाव, ता.इगतपूरी, जि.नाशिक येथे अन्नपूर्णा मध्यवर्ती स्वयंपाक गृह कार्यान्वित आहे. सदर मध्यवर्ती स्वयंपाक गृहामार्फत नजिकच्या सर्व शासकीय आश्रमशाळांना भोजनाचा पुरवठा नियमीतपणे केला जातो. यात शासकिय आश्रमशाळा काळुस्तेचाही समावेश आहे. सदर आश्रमशाळेस अन्नपूर्णा मध्यवर्ती स्वयंपाक गृह, मुंढेगाव, ता.इगतपूरी यांचे मार्फत माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये दररोज नियमितपणे जेवणाचा पुरवठा वेळेवर करण्यात आला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना उपाशी रहावे लागलेले नाही.

तसेच, शासकीय आश्रम शाळा, काळुस्ते या शाळेच्या आस्थापने वरील अधिक्षक पद रिक्त नाही. तथापि सदर आश्रम शाळेस मध्यवर्ती स्वयंपाक गृहा मार्फत जेवणाचा पुरवठा होत असल्याने कार्यरत अधिक्षक यांची कामाची पर्यायी व्यवस्था मध्यवर्ती स्वयंपाकगृह मुढेगांव येथे करण्यांत आलेली आहे. तसेच सदर आश्रम शाळेवरील अधिक्षकांना त्यांचे मुळ आस्थापनेवर पाठविण्या बाबतची कार्यवाही करण्यांत येत आहे. त्याच प्रमाणे आस्थापने वरील शिक्षक संवर्गातील कर्मचारी ही नियमितपणे उपस्थित राहत आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आदिवासी अनुदानित आश्रमशाळांच्या सुरक्षा रक्षकांचे मानधन, विद्‌यार्थ्यांचे परिरक्षण अनुदान व आश्रमशाळांमध्ये क्रिडा शिक्षकाचे पद मंजूर करण्याबाबत

**(३८) * १३३७५० श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी अनुदानित आश्रमशाळांमधील सुरक्षा रक्षकांच्या मानधनात वाढ करणे, आश्रमशाळांमधील विद्‌यार्थ्यांच्या परिरक्षण अनुदानात वाढ करणे,

शासकीय आश्रमशाळांप्रमाणे अनुदानित आश्रमशाळांमध्ये क्रिडा शिक्षकांचे पद मंजूर करावे इ. लोकप्रतिनिधींच्या मागण्यांच्या संदर्भात दिनांक १८ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.आदिवासी विकास मंत्री यांचे उपस्थितीत झालेल्या बैठकीत मान्य करण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त बैठकीच्या अनुषंगाने घेण्यात आलेल्या निर्णयांची अंमलबजावणी न झाल्याबाबत लोकप्रतिनिधींनी मा.प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचेकडे दिनांक ५ सप्टेंबर, २०१८ रोजीच्या पत्रान्वये लक्ष वेधले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले, त्यानुसार उक्त मागण्या पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) मा.मंत्री, आदिवासी विकास यांचेकडे दिनांक १४ मार्च, २०१८ रोजी झालेल्या बैठकीमध्ये आदिवासी विभागांतर्गत अनुदानित आश्रमशाळेतील सुरक्षा रक्षकांचे मानधन वाढविण्याबाबत निर्णय घेण्यात आला होता. तसेच अनुदानित आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांच्या परिरक्षण अनुदानात वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने मा.मुख्य सचिवांना तात्काळ सादर करावा, असा निर्णय घेण्यात आला होता.

तथापि, अनुदानित आश्रमशाळांमध्ये क्रिडा शिक्षकाचे पद भरण्याबाबतची मागणी मान्य करण्यात आलेली नाही.
(२) परिरक्षण अनुदानात वाढ करणेबाबतचे निवेदन मा.प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांना दिले आहे, हे खरे आहे.
(३) अनुदानित आश्रमशाळांमधील सुरक्षा रक्षकांच्या मानधन वाढविण्याबाबतचा प्रस्ताव अभिप्रायासाठी कामगार विभागाकडे पाठविण्यात आला होता. कामगार विभागाचे अभिप्राय प्राप्त झाले असून त्या विभागाच्या अभिप्रायांची छाननी करुन त्यानुसार सुरक्षारक्षकांचे मानधन वाढविण्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे. सुधारीत आश्रमशाळा संहितेमध्ये क्रिडा शिक्षक व कला शिक्षकांचा

समावेश करण्यात आला असून आश्रमशाळा संहितेस मान्यता देण्याबाबतची बाब अंतिम टप्प्यात आहे.

तसेच अनुदानित आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांच्या परिरक्षण अनुदानात वाढ करण्याबाबत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत कार्यवाही चालू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद विभागात “सौभाग्य योजनेचा” लाभ घेणारे बनावट लाभार्थी आढळून आल्याबाबत

**(३९) * १३२३१३ श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद विभागात केंद्र शासनाच्या अधिकाऱ्यांच्या पथकाने केलेल्या पाहणीत केंद्र शासनाच्या “सौभाग्य योजनेचे” सुमारे ३२ हजार बनावट लाभार्थी आढळून आल्याची बाब दिनांक १७ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय;

(३) असल्यास, त्यात काय आढळून आले आणि सदर प्रकरणातील बनावट लाभार्थी आणि महावितरणच्या दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

केंद्र शासनाच्या अधिकाऱ्यांच्या पथकाने औरंगाबाद परिमंडलांतर्गत कार्यान्वित केंद्र शासनाच्या सौभाग्य योजनेची पाहणी केलेली नाही. सौभाग्य पोर्टलनुसार दिनांक ११.१०.२०१७ रोजी औरंगाबाद परिमंडलांतर्गत औरंगाबाद जिल्ह्यात एकूण ३४००३ इतक्या घरांचे विद्युतीकरण करण्याचे उद्दिष्ट होते. तसेच जालना जिल्ह्यात एकूण १७९०४ इतक्या घरांचे विद्युतीकरण करण्याचे उद्दिष्ट होते. दिनांक ३१.१०.२०१८ च्या प्रगती अहवालानुसार सदर दोन्ही जिल्हयातील उद्दिष्ट पूर्ण झाले आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खराडी (जि.पुणे) येथील झेन्सार कंपनीजवळील रोहित्राचा स्फोट होऊन २ व्यक्तींचा मृत्यू झाल्याबाबत

**(४०) * १३३१३१ श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खराडी (जि.पुणे) येथील झेन्सार कंपनीजवळील रोहित्राच्या स्फोटामध्ये २ व्यक्तींचा माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.ऊर्जामंत्री यांचेशी पत्रव्यवहार करून मृत व्यक्तींच्या नातेवाईकांना सहाय्यता निधी मिळणेबाबत विनंती करुनही संबंधित विभागाकडून कोणतीही कार्यवाही झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वडगावशेरी (जि.पुणे) येथील विविध विभागामधील रोहित्र जीर्ण झाले असून महावितरणने ते बदलण्याची कार्यवाही न केल्यामुळे त्यात तांत्रिक अडचणी निर्माण होऊन त्या रोहित्रांचा स्फोट होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने याबाबत पाहणी केली आहे काय त्यात काय निदर्शनास आले व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) सदर मृत व्यक्तींच्या नातेवाईकांना सहाय्यता निधी मिळण्याबाबतचा प्रस्ताव महावितरण कंपनीकडे मंजुरीच्या प्रक्रियेत आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्राला नियमित कोळसा पुरवठा करण्याबाबत

**(४१) * १३०३१४ डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्राकडे केवळ अर्धा दिवस पुरेल इतका कोळसा शिल्लक असल्याने ५०० मेगावॅटचे दोन संच तातडीने बंद केल्याचे दिनांक १ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या महिन्याभरापासून चंद्रपूर केंद्राला अनियमित कोळसा पुरवठा होत असल्याने वीज टंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तातडीने नियमित कोळसा पुरवठा होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्रातील संच क्र. ७ दिनांक ०१.०९.२०१८ ते १०.०९.२०१८ व संच क्र. ८ दिनांक ०१.०९.२०१८ ते ०६.०९.२०१८ या कालावधीत कोळशाअभावी बंद होते.

(२) व (३) कोळसा कंपन्यांकडून महानिर्मिती कंपनीच्या औष्णिक वीज केंद्राला अनियमित कोळसा पुरवठा होत असल्यामुळे चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्राने खालील उपाययोजना तातडीने सुरु केल्या आहेत :-

१) रस्ता मार्गे भटाडी खदानीतून दररोज ५००० मे.टन कोळसा उचलण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

२) वेस्टर्न कोल्ड फिल्ड लि. च्या कोल कंपन्यांकडून (रेल्वे व रोपवे) मार्गाने जास्तीत जास्त कोळसा प्राप्त करण्याकरिता सतत प्रयत्न सुरु आहे.

३) महानिर्मितीने SCCL या कोळसा कंपनीसोबत सध्याच्या इंधन पुरवठा कराराखेरीज सन २०१८-२०१९ मध्ये ११५ लक्ष मे. ट. अतिरिक्त कोळसा घेण्यासाठी सामंजस्य करार केला आहे. व त्यानुसार कोळसा पुरवठा सुरु आहे.

४) कोळशाचा तुटवडा भरुन काढण्यासाठी महानिर्मितीच्या जुन्या संचांचे (Old Discommissioned Units) ४.२२९ द.ल.मे.ट. इतक्या कोल लिंकेजचे कोराडी विस्तारित प्रकल्पाकडे (३X६६० मे.वॅ. Super Critical Units) हस्तांतरण करण्यासाठी संयुक्त सचिव, केंद्रीय कोळसा मंत्रालय यांना महानिर्मितीकडून विनंती करण्यात आली आहे.

५) महानिर्मितीने, संयुक्त सचिव, केंद्रीय कोळसा मंत्रालय यांना कोराडी औष्णिक विद्युत केंद्र (३X६६० मे.वॅट), चंद्रपूर (२X५०० मे.वॅट) आणि परळी (१X२५० मे.वॅट), या संचांसाठीच्या सध्याच्या ब्रिज लिंकेजला वाढीव कोळसा मात्रेसह पुढील ३ वर्षासाठी (सन २०२१ पर्यंत) मुदत वाढ देण्याची विनंती केली आहे.

६) महानिर्मितीने डब्ल्यू.सी.एल.च्या कोळसा खाणींमधून दररोज अंदाजे ११८०० मे.टन एवढा कोळसा रस्ता वाहतुकीने औष्णिक विद्युत केंद्रांना पुरवठा करण्याचे काम कंत्राटाव्दारे सुरु केले आहे.

वरील प्रयत्नांमुळे चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्रात येणाऱ्या कोळशाचे प्रमाण वाढले असून कोळशाच्या साठयात वाढ अपेक्षित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## घुगुस (जि.चंद्रपूर) येथील लॉयड मेटल कंपनीत अग्निसुरक्षा यंत्रणा स्थापित करण्याबाबत

**(४२) * १३३९३० श्री.अमर काळे (आर्वी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **उद्‌योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घुगुस (जि.चंद्रपूर) येथील लॉयड मेटल कंपनीत सुमारे १५०० कामगार कार्यरत असून सदर ठिकाणी लोहा व विघुत तयार करण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनीमध्ये कोणतीही अग्निसुरक्षा यंत्रणा स्थापित करण्यात आली नसल्याचे दिनांक १५ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आल्याने कामगारांची सुरक्षितता धोक्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त कंपनीवर कारवाई करण्याबाबत तसेच अग्निशमन यंत्रणा स्थापित करुन कामगारांच्या सुरक्षेबाबत उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) व (२) घुगुस (जि.चंद्रपूर) येथील लॉयड मेटल कंपनीत सुमारे १५०० कामगार कार्यरत असून, सदर ठिकाणी लोहा व विद्‌युत तयार करण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे कंपनीमध्ये कोणतीही अग्निसुरक्षा यंत्रणा स्थापित करण्यात आली नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे.

(३), (४) व (५) सदर कंपनीस सन २०१२ मध्ये तात्पुरते ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले होते. तथापि ना-हरकत प्रमाणपत्रामध्ये सुचविलेल्या अग्निप्रतिबंधक उपाययोजनांची पुर्तता न केल्यामुळे सदर कारखान्यास नोटीस बजावण्यात आली होती. कारखान्याने तात्पुरत्या ना हरकत प्रमाणपत्रामध्ये सुचविलेल्या अग्निप्रतिबंधक उपाययोजनांची पुर्तता करण्याची कार्यवाही सुरु केली आहे.

-----------------

## राज्यातील व्यापाऱ्यांनी 'धान्य खरेदी बंद' या केलेल्या आंदोलनाबाबत

**(४३) * १२८२९७ श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड**

**उत्तर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.संजय कदम (दापोली), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.मधुसूदन केंद्रे (गंगाखेड), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषत: बुलढाणा जिल्ह्यातील व्यापाऱ्यांनी शेतमालाची खरेदी शासनाने ठरवून दिलेल्या आधारभूत किंमतीपेक्षा कमी दरात करणाऱ्या व्यापाऱ्यांना एक वर्षाची कैद व ५० हजार रुपयांचा दंड करण्याच्या निर्णयाविरोधात धान्य खरेदी बंद आंदोलन सुरु केल्याचे दिनांक २४ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील धान्यबाजार पूर्णत: कोलमडल्याने विशेषत: या काळामध्ये शेतकऱ्यांनी विक्रीस आणलेला शेतीमालाची किंमत हमीभावापेक्षा २५ टक्क्यांनी बाजारात घसरून शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील व्यापाऱ्यांनी गुन्हे दाखल होतील म्हणून बाजार समित्या बंद ठेवल्यास पुन्हा आवक वाढून तो भावही व्यापारी देणार नाहीत, त्यापेक्षा खरेदी सुरु ठेवावी, अशी मागणी शेतकरी सुकाणू समितीचे सदस्य एस.बी.पाटील यांनी माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर संपूर्ण प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार धान्य व्यापाऱ्यांच्या या समस्येवर उपाययोजना करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) हे खरे नाही.

राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये हमीभाव लागू नसलेल्या पिकांसाठी जाहिर करावयाच्या वैधानिक किमान किंमतीपेक्षा कमी दरात खरेदी करणाऱ्या व्यापारांना १ वर्षाची कैद व रु. ५० हजार दंड करण्याबाबत तरतुदीचा अंतर्भाव ॲक्टच्या प्रारूपामध्ये करण्यात आलेला होता. मात्र नंतर सदर प्रावधान मागे घेण्यात आले असून याविषयी दिनांक २५ ऑक्टोबर, २०१८ रोजी Promulgate झालेल्या अध्यादेशामध्ये कोणतीही तरतुद करण्यात आली नाही. तथापि, अद्यापपर्यंत तसा अध्यादेश किंवा शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला नाही.

(२) नाही.

(३) नाही.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शेतकऱ्यांना पात्र असूनही अद्याप कर्जमाफीपासून वंचित रहावे लागल्याबाबत

**(४४) * १२६५५३ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्वच राष्ट्रीयीकृत बँकांनी आपला तोटा लपविण्यासाठी शेतकऱ्यांचे कर्ज निर्लेखित करुन आपल्या तोट्याच्या लेख्यातून कमी केले, तथापि निर्लेखित केलेल्या शेतकऱ्यांची यादी कर्जमाफीसाठी पाठविण्यात आली नसून सन २०१४ पासून माहे मार्च, २०१८ पर्यंत बँकांनी ३ लाख १५ हजार ५१४ कोटी रुपयांची कर्जे निर्लेखित केली त्यामध्ये शेतकऱ्यांच्या कर्जाचा वाटा केवळ १७ हजार ४२६ कोटी रुपये आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बँकांनी शेतकऱ्यांची कर्जे निर्लेखित केली तरी शेतकऱ्यांच्या खात्यावरील बोजा कमी होत नसून बँकांनी निर्लेखित केलेल्या खात्यांची यादी मुख्यमंत्र्यांनी जाहीर केलेल्या योजनेसाठी गेली नसल्यामुळे या शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळालाच नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, कर्जमाफीची घोषणा झाल्यानंतर निकषानुसार कर्जमाफीला पात्र ठरत असलेल्या शेतकऱ्यांनी ऑनलाईन अर्ज केले परंतु अद्याप ५० टक्के शेतकऱ्यांना कर्जमाफीची रक्कम मिळाली नसून शासनाने नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर २५ हजार रुपयांचे अनुदान देण्याचा निर्णय घेतला होता पण अद्यापही सदर अनुदान शेतकऱ्यांना मिळालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार याप्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली आहे तसेच ज्या शेतकऱ्यांना कर्जमाफी व प्रोत्साहनपर लाभ मिळू शकला नाही त्यांना तो मिळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) व (२) राष्ट्रीयकृत बँकांनी निर्लेखित केलेली कर्जे ही बँकांच्या अंतर्गत कामकाजाच्या बाबी मधील असल्याने याबाबतची माहिती राज्य शासनाच्या स्तरावर उपलब्ध नाही. तसेच सदरची माहिती भारतीय रिझर्व्ह बँकेने ठरवून दिलेल्या आवधिक परताव्यापैकी नसल्याने ती राज्यस्तरीय बँकर्स समितीकडेही उपलब्ध नाही. बँकांनी निर्लेखित केलेल्या कर्जांचा छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेच्या लाभासाठी समावेश करण्यात आलेला नाही.

(३) छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेंतर्गत सद्यस्थितीत २२.७६ लाख खातेदारांना कर्जमाफीपोटी १२,५२८.२४ कोटी रकमेचा लाभ देण्यात आला आहे. तसेच १५.९८ लाख खातेदारांना २,५७६.८६ कोटी प्रोत्साहनपर रकमेचा लाभ देण्यात आलेला आहे व उर्वरित पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्याची प्रक्रीया सुरू आहे.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर शहरात धोकादायक वीज तारांचे भुयारी वायरिंग करण्याच्या कामाबाबत

**(४५) * १३०२९० श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरात धोकादायक वीज तारांचे भुयारी वायरिंग करण्याकरिता केंद्र शासनाकडून २२ कोटींचा निधी महावितरणकडे देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कामाच्या खोदाईकरिता कोल्हापूर महानगरपालिकेने महावितरणला १२ कोटी रुपयांची मागणी केली असून त्याशिवाय रस्ते खोदाईला परवानगी नाकारली असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे सदरील निधी परत जाण्याची शक्यता आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदरील काम तातडीने पूर्ण करण्याकरिता कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

कोल्हापूर शहरात भूमिगत विद्युत वाहिनी टाकण्यासाठी एकात्मिक ऊर्जा विकास योजनेतंर्गत रु. २०.८६ कोटी निधी मंजूर झाला आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) हे खरे आहे.

महावितरण कंपनीकडून भूमिगत विद्युत वाहिनीकरिता रस्ते खोदाई प्रस्तावास मंजुरी मिळण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांना सद्यस्थिती अवगत करण्यात आली. तसेच आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका यांना दि. २० ऑगस्ट, २०१८ च्या पत्रान्वये भूमिगत विद्युत वाहिन्या टाकण्यासाठी नागपूर महानगरपालिकेसोबत झालेल्या कराराच्या

धर्तीवर मंजुरी मिळावी व सदर योजनेकरिता उपलब्ध असलेल्या सर्व निधीचा योग्य विनियोग करुन सर्व कामे पूर्ण करण्यासाठी महावितरण कंपनीला सहकार्य करण्यास विनंती करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील सौर ऊर्जा प्रकल्प निर्मितीस चालना देण्याबाबत

**(४६) * १२७४२१ श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात वीज निर्मितीसाठी येणारा खर्च व प्रदूषण रोखण्यासाठी केंद्र शासनाने सौर ऊर्जेचा वापर करण्यासाठी “सोलर मिशन” हा प्रकल्प हाती घेतला असून या मिशनमध्ये महाराष्ट्र राज्य देशात मागे राहिले असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात २२ हजार मेगावॅट विजेची मागणी असताना निर्मिती मात्र ६ हजार मेगावॅट इतकी असून बाकीची वीज ही खाजगी वीज निर्मात्यांकडून घ्यावी लागत असून सौर ऊर्जा प्रकल्प मंजुरीसाठी अधिकाऱ्यांमार्फत विनाकारण विलंब होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, त्यानुसार सौर ऊर्जा प्रकल्प निर्मितीस चालना देण्यासाठी राज्य शासनाकडून कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत,
(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) केंद्र शासनाच्या नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाने “जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय सोलर मिशन” योजनेंतर्गत राष्ट्रीय स्तरावर सौर उर्जेपासून सन २०२२ पर्यंत १०० गिगावॅट इतकी वीज निर्मिती करण्याचे उद्दीष्ट जाहीर केले आहे. राज्य शासनाने दिनांक २०/७/२०१५ च्या शासन निर्णयान्वये जाहिर केलेल्या अपारंपारिक ऊर्जा निर्मितीच्या

धोरणानुसार, सौर ऊर्जा निर्मितीचे उद्दिष्ट ७५०० मेगावॅट आहे. यापैकी सप्टेंबर, २०१८ अखेर १०१७.४५ मेगावॅटच्या निर्मितीचे प्रकल्प कार्यान्वित करण्यात आले असून साधारणत: ४५०० मेगावॅट क्षमतेच्या उर्जा निर्मिती प्रकल्पांना पारेषण संलग्नता प्रमाणपत्र दिले असून त्यास अनुसरून सौर ऊर्जा निर्मितीची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(२) हे खरे नाही.

(३) राज्यात ऊर्जा निर्मिती प्रकल्पास चालना देण्याच्या दृष्टीने शासन निर्णय दिनांक २०/७/२०१५ अन्वये पारेषण संलग्न उर्जा निर्मितीचे एकत्रित धोरण, २०१५ व शासन निर्णय दिनांक ११/२/२०१६ नुसार पारेषण विरहित ऊर्जा निर्मितीचे एकत्रित धोरण, २०१६ जाहिर केले आहे. केंद्र व राज्य शासनाच्या विविध धोरणे व योजनांच्या सहाय्याने सौर उर्जा प्रकल्प राबविण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वरसई (ता.पेण, जि.रायगड) येथील आदिवासी आश्रमशाळेतील १८ विद्यार्थ्यांना दुधातून विषबाधा झाल्याबाबत

**(४७) * १२६५१३ श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरसई (ता.पेण, जि.रायगड) येथील आदिवासी आश्रमशाळेतील १८ विद्यार्थ्यांना दिनांक १६ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास दुधातून विषबाधा झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुधात बोअरिंगचे पाणी मिसळल्यामुळे ही विषबाधा झाल्याचे निदर्शनास आले असून विद्यार्थ्यांना मळमळ, उलटया व ताप याचा त्रास होऊ लागल्याने त्यांना उपजिल्हा रुग्णालयात दाखल करावे लागले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) तद्नुसार यास जबाबदार असणा-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) व (२) शासकीय आश्रमशाळा, वरसई येथील १८ विदयार्थ्यांना ताप, सर्दी, खोकला, डोकेदुखी, थंडी, थकवा इत्यादीच्या उपचाराकरीता उपजिल्हा ग्रामीण रुग्णालय, पेण येथे दि.१३.०८.२०१८ रोजी दाखल करण्यात आले होते व ४ विदयार्थ्यांना सामान्य जिल्हा रूग्णालय, अलिबाग येथे दि.१७.०८.२०१८ व दि.१८.०८.२०१८ रोजी दाखल करण्यात आले होते. सदर आश्रमशाळेतील असे एकूण २२ विदयार्थ्यांना उपचारासाठी रूग्णालयात दाखल करण्यात आले होते.

परंतु, उपजिल्हा रुग्णालय, पेण (जि.रायगड) येथे बालरोग तज्ञ डॉक्टर नसल्याने तेथील १८ विद्यार्थ्यांना सामान्य जिल्हा रुग्णालय, अलिबाग (जि.रायगड) येथे पुढील उपचारासाठी दाखल करण्यात आले होते.

उपजिल्हा ग्रमीण रुग्णालय, पेण (जि.रायगड) येथे उपचारासाठी दाखल १८ विद्यार्थ्यांची दि.१६.०८.२०१८ रोजी रक्त तपासणी केल्यानंतर त्यांना दुधामधुन कोणतीही विषबाधा झाली नसून ताप असल्याचे निदान झाले. सर्व २२ विद्यार्थ्यांवर औषधोपचार करुन डिस्चार्ज देण्यात आला आहे. आजारी विद्यार्थ्यांवर शालेय प्रशासनाकडुन वेळीच उपचार करणेसाठी तातडीने प्रयत्न करण्यात आलेले आहेत व सर्व विद्यार्थी सुस्थितीत असून नियमित शाळेत उपस्थित आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात वीज दरवाढ करण्याचा निर्णय महावितरणने घेतल्याबाबत

**(४८) * १२६७०२ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी),**

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.संजय कदम (दापोली), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.मधुसूदन केंद्रे (गंगाखेड), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :**
सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वीज दरवाढ करण्याचा निर्णय महावितरणने घेतल्याने वीज ग्राहक आणि औद्योगिक संघटनेच्या राज्यस्तरीय समितीने या विरोधात आंदोलन करण्याचा निर्णय घेतला असून याविरोधात राज्यभरातून सुमारे ११ हजार हरकती महावितरण आणि महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महावितरणने दिनांक १ सप्टेंबर, २०१८ रोजीपासून वीज दरवाढ करताना ५ वर्षातील महसूली तूट भरुन काढण्यासाठी २ वर्षात ३४,६४६ कोटी रुपयांच्या महसूल प्राप्तीचा प्रस्ताव दिला असून आयोगाने यापैकी २०,६५१ कोटींच्या मागणीस मंजूरी देऊन १५ टक्के दरवाढीस अनुमती दिली आहे तर प्रत्यक्षात १५ टक्क्यांपैकी ६ टक्के म्हणजेच ८२६८ कोटी रुपयांची रक्कम येत्या दीड वर्षांतील दरवाढीद्वारा वसूल केली जाणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उर्वरित १२,३८२ कोटी रुपयांची रक्कम नियामक मत्ता (Regulatory Asset) म्हणून दाखवून, सदर रक्कम २०२० नंतर नियामक मत्ता आकार (RAC) म्हणून वीज ग्राहकांकडून व्याजासह वसूल केली जाणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने राज्यातील बेस्ट, टाटा, रिलायन्स व महावितरण या चारही कंपन्यांचे दरनिश्चती आदेश एकाचवेळी जाहीर केले असतानाही केवळ महावितरण या एकाच कंपनीच्या दरामधील वाढ १५ टक्के इतकी प्रचंड मंजूर केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, केवळ शासनाच्या मालकीची कंपनी म्हणून आयोगाने महावितरणच्या अनेक बेकायदेशीर मागण्यांना मान्यता दिली असून, स्पर्धा, कार्यक्षमता व ग्राहकांचे हितरक्षण या वीज कायद्यातील महत्वाच्या तरतुदींचे उल्लंघन केले असून कृषीपंपाचा वीज वापर १५,००० दशलक्ष युनिट असताना तो ३० हजार दशलक्ष युनिट दाखविण्यात आला असून, वीज गळती ३० टक्के असताना १५ टक्के दाखविण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, कृषी पंपाच्या वीज दरात वाढ केल्याने शेती व्यवसायावर विपरित परिणाम होणार असून महावितरणने आयआयटी, मुंबई व कृषी पंप वीज वापर सत्यशोधन समिती यांचा अहवाल वीज नियामक आयोगासमोर न ठेवता आयोगाची तसेच शासनाची फसवणूक केली असून याप्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,

(७) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार वीजदरवाढ वस्तुस्थितीनुसार कमी करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

महावितरणने ३४६४६ कोटी रुपयांची महसूली तूट भरुन काढण्यासाठी प्रकरण क्र.१९५/२०१७ व्दारे सादर केलेल्या वीज दर याचिकेवर आयोगाने दि. ०६ ऑगस्ट, २०१८ ते दि. १६ ऑगस्ट, २०१८ या कालावधीत राज्याच्या ६ महसूली विभागात म्हणजेच अमरावती, नागपूर, पुणे, औरंगाबाद, नाशिक व नवी मुंबई येथे जनसुनावणी घेऊन ग्राहकांच्या सुचना व हरकती ऐकून घेतल्या. सदर सुचना व हरकती यांचा विचार करुन, तसेच विद्युत अधिनियम, २००३ व बहु-वर्षीय वीज दर विनियम, २०१५ यामधील तरतूदींचा विचार करुन आयोगाने दि.०१ सप्टेंबर, २०१८ पासून महावितरण वीज दरात सुधारणा करण्याचे आदेश पारीत केले आहेत.

(२) हे खरे आहे.

महावितरणने सादर केलेल्या ३४६४६ कोटी रुपयांच्या याचिकेवर निर्णय देताना आयोगाने २०६५१ कोटी रुपये इतकी महसूल गरजेतील वाढ मंजूर केली आहे. तथापि, या वाढीमुळे ग्राहकांना वीज दर वाढीचा धक्का बसू नये यासाठी आयोगाने केवळ ८२६८ कोटी रुपये हे सन २०१८-१९ व २०१९-२० या वर्षात वसूल करण्याची परवानगी दिली असून उर्वरित रक्कम रु. १२३८२ कोटी यांची नियामक मत्ता (Regulatory Asset) म्हणून दाखवण्यात आली आहे.

(३) हे खरे आहे. रु.१२३८२ कोटी ही नियामक मत्ता म्हणून ग्राहकांकडून मार्च, २०२० नंतर वीजदरामार्फत वसूल करण्याबाबत महावितरणला त्यांच्या पुढील वीज दर याचिकेत प्रस्तावित करण्यास आयोगाने सांगितले आहे.

(४) हे खरे नाही. रु. २०६५१ कोटी इतकी महावितरणच्या महसुली गरजेस आयोगाने मंजुरी दिली असली तरीही ग्राहकांना वीज दर वाढीचा धक्का बसू नये म्हणून सन २०१८-१९ व २०१९-२० या दोन वर्षात मिळून केवळ रु.८२६८ कोटी इतकी महसुली वाढ वीजदरामार्फत मंजूर केली आहे की जी ५-६ % इतकीच आहे.

(५) हे खरे नाही.

आयोग वीजदर याचिकेवर विद्युत अधिनियम, २००३ व बहु-वर्षीय वीजदर विनियम, २०१५ मधील तरतुदी तसेच ग्राहकांकडून प्राप्त झालेल्या सूचना व हरकती विचारात घेऊन आदेश पारीत करते. शासकीय किंवा बिगर शासकीय कंपनी असा कोणताही फरक करण्यात येत नाही.

(६) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने महावितरण कंपनीच्या कृषीपंप ग्राहकांच्या वीज वापराचा अभ्यास करण्यासाठी एका कार्यगटाची स्थापना केली असून सदर कार्यगटाचा अहवाल जानेवारी / फेब्रुवारी २०२० पर्यंत अपेक्षित आहे. त्यामुळे यासंदर्भात MSEB सूत्रधारी कंपनीअंतर्गत स्थापित समितीचा अहवाल प्रलंबित ठेवण्याचा निर्णय सूत्रधारी कंपनीने घेतला आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उमरगा (जि.उस्मानाबाद) शहरामध्ये आर.पी.डी.आर.पी. योजनेतंर्गत झालेल्या कामातील गैरव्यवहाराबाबत

**(४९) * १३२८६९ श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरगा (जि.उस्मानाबाद) शहरामध्ये आर.पी.डी.आर.पी. योजना सन २०११-१२ व २०१२-१३ मध्ये नवीन १० ते १३ डी.पी., ५० ते ६० पोल वीज वाहिनीसह इ. कामे मंजूर होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरची कामे पूर्ण होऊन ३ वर्षापेक्षा जास्त कालावधी पूर्ण होऊनही सदरचे डी.पी. व पोल अद्यापपर्यंत कार्यान्वित करण्यात आलेले नाहीत परंतू संबंधित कंत्राटदारास सदर कामाचे देयक देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेच्या निधीत गैरव्यवहार झाल्यामुळे सर्व संबंधितांवर कारवाई करणेबाबत उमरगा-लोहारा येथील लोकप्रतिनिधी यांनी मा.ऊर्जामंत्री यांना दिनांक १ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राद्वारे विनंती केली होती, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शासनाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) मा.लोकप्रतिनिधी यांनी लेखी पत्राद्वारे विनंती केली होती. सदर योजनेमधील मंजूर कामे पूर्ण झाल्यामुळे कार्यवाही केली नाही.
(४) आर.ए.पी.डी.आर.पी. योजनेअंतर्गत दि.१९.०१.२०१२ रोजीच्या कार्यादेशाद्वारे उमरगा शहरासाठी नेमून दिलेली कामे कंत्राटदाराने दि.०३.११.२०१३ अखेर पूर्ण केलेली आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यात दारु व अंमली पदार्थांची तस्करी होत असल्याबाबत

**(५०) * १२६९२३ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यात दारुबंदी असूनही कोट्यवधी रुपयांची दारु परजिल्ह्यातून आणून त्याची विक्री चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यात होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान कोट्यवधी रुपयांची दारु चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यात पोलिसांनी पकडली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच चंद्रपूर जिल्ह्यात ड्रग्ज व ब्राऊन शूगरची तस्करी होत असून युवक व विद्यार्थी या नशेच्या आहारी जात असल्याची बाब ज्ञानदा शिक्षण संस्था, चंद्रपूर इनरव्हिल क्लब ऑफ स्मार्ट सिटी चंद्रपूर यांनी शासनाच्या निदर्शनास आणली आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार दारुबंदी कायद्याचे उल्लंघन करणा-यांवर व अंमली पदार्थांची तस्करी करणा-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) होय. अंशत: खरे आहे.

(३) सदर संस्थांचे निवेदन शासनास प्राप्त झालेले नाही. तथापि, पोलीस विभागाकडून याप्रकरणी कारवाई करण्यात येत आहे.

(४) अवैध दारुची निर्मिती/विक्री/वाहतूक करणाऱ्या विरूध्द पोलीस विभाग व राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून वेळोवेळी कार्यवाही करण्यात आलेली आहे. पोलीस विभागाने चंद्रपूर जिल्हयात माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये ९२८ प्रकरणांमध्ये ८७० आरोपींना अटक करून त्यांचेकडून रु.४.९२ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच, गडचिरोली जिल्हयात १६६ प्रकरणांमध्ये, अटक केलेल्या २२७ आरोपींकडून रु.६२.८० लक्ष रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागाकडूनही ऑगस्ट, २०१८ मध्ये, चंद्रपूर जिल्हयात ४७ गुन्हे नोंदविले असून यामध्ये अटक केलेल्या ३४ आरोपींकडून रु.३.८० लाखाचा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच गडचिरोली जिल्हयामध्येही ६ गुन्हे नोंदविले असून रु.१.७३ लाखाचा मुद्देमाल जप्त केला आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत पोलीस विभागाशी समन्वय साधून संयुक्त मोहिमेचे आयोजन करून अवैध दारु धंद्यांविरोधात कारवाई करण्यात येते. विभागाचे स्थानिक अधिकारी/कर्मचारी तसेच भरारी पथकाकडून वेळोवेळी कारवाई केली जाते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अकोला शहर व जिल्ह्यात महावितरण कंपनीकडून अनियमित मीटर वाचन केले जात असल्याबाबत

**(५१) * १३१०६८ श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला शहर व जिल्ह्यात महावितरण कंपनीकडून नियमित मीटर वाचन न करताच हजारो ग्राहकांना देयके देण्यात येत असल्याचा प्रकार माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी मीटर रीडर्स यांच्या निष्काळजीपणामुळे ग्राहकांना देयके दिली गेली नसल्याने कार्यकारी अभियंता यांनी दिनांक २९ सप्टेंबर २०१८ रोजी वा त्यासुमारास बैठक घेतली असून सदर बैठकीत कार्यकारी अभियंता व मीटर्स रीडर्स यांचे मध्ये मारहाण झाल्याने कार्यकारी अभियंता यांनी रामदासपेठ पोलीस स्टेशन, अकोला येथे तक्रार केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार दोषींवर कारवाई करण्याबाबत व देयक वितरणामध्ये सुसूत्रता आणण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

अकोला शहर व जिल्ह्यातील सर्वच घरगुती, वाणिज्य व औद्योगिक वीज ग्राहकांच्या मीटरचे वाचन केले जाते व ग्राहकांना त्यांच्या मीटर वाचनानुसारच वीज देयके दिली जातात.

(२) हे खरे आहे.

सदरची बैठक अतिरिक्त कार्यकारी अभियंता, शहर उपविभाग क्र.१, अकोला यांनी मीटर वाचक (मीटर वाचक एजन्सी) सोबत आयोजित केली होती. सदर बैठकीदरम्यान मीटर वाचक कर्मचाऱ्यांनी अतिरिक्त कार्यकारी अभियंता, शहर उपविभाग क्र.१ अकोला यांना मारहाण केल्याची तक्रार रामदासपेठ पोलीस स्टेशन, अकोला येथे महावितरण कंपनीतर्फे नोंदविण्यात आली आहे.

(३) विभागीय चौकशी करण्याकरिता महावितरण कंपनीतर्फे दि. ०५.११.२०१८ रोजी चौकशी समिती गठीत करण्यात आली असून चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर कारवाई करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पांढरी (ता.अंजनगावं सुर्जी, जि.अमरावती) गावातील मुलींच्या निवासी आश्रमशाळेतील एका मुलीचा मारहाणीमुळे झालेला मृत्यु

**(५२) * १२९९०३ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पांढरी (ताअंजनगावं सुर्जी, जि.अमरावती) गावातील मुलींच्या निवासी आश्रमशाळेतील कु.निशा गणेश जगदवे हिचा भारत विकास ग्रुप (बीव्हीजी) या कंपनीत काम करणाऱ्या श्री.योगेश नरेंद्र रायबोले, व्यवस्थापक याने केलेल्या मारहाणीत मृत्यु झाला असल्याचे दिनांक ६ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी आश्रमशाळेच्या आवारात १६ सीसीटीव्ही कॅमेऱ्यापैकी ६ ते ७ कॅमेरे सुरु असून निवासी शाळेला असलेल्या संरक्षण भिंतीला मोठे छिद्र पाडून तेथून मध्यरात्री मुली किंवा बाहेरील तरुण आत येत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय निदर्शनास आले व चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषीविरुद्ध कारवाई करण्याबाबत तसेच वसतिगृहाच्या सुरक्षेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) मुलींचा मृत्यु ब्रेन हॅमरेजने झाल्याचे शव विच्छेदन आहवालामध्ये नमुद करण्यात आलेले आहे. तथापि यासंदर्भात पोलिसांचा तपास पुर्ण झालेला नसल्याने मारहाणीबाबत निष्कर्ष काढता आलेले नाहीत.

(२) निवासी शाळेच्या भिंतीला छोटे छिद्र असून, या छिद्रामधून व्यक्ती ये-जा शक्य नाही.
(३) या प्रकरणी उप विभागीय अधिकारी (महसूल), दर्यापूर जि.अमरावती यांचे अध्यक्षतेखालील समितीकडून चौकशी करण्यात आलेली आहे.
(४) सदर चौकशीमध्ये वसतीगृहात आढळून आलेल्या त्रुटीसंदर्भात संबधित निवासी शाळेचे मुख्याध्यापक, अधिक्षक व सहायक शिक्षिका यांना निलंबित करण्यात आलेले असून, त्यांचेविरुध्द शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित आहे. तसेच वसतीगृहासाठी नविन सुरक्षा रक्षक नियुक्त करण्यात आलेले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गडचिरोली जिल्हयातील उद्योग प्रकल्पांना निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(५३) * १३०३३२ डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्हयात उद्योग सुरु करण्याकरीता संधी असूनही शासनाच्या उदासीन धोरणामुळे अजूनपर्यंत मोठा उद्योग सुरू होवू शकला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मेक इन गडचिरोलीच्या पुढाकाराने जिल्हयातील नव उद्योजकांनी नवीन उद्योग सुरू करण्यासाठी जिल्हा उद्योग केंद्राकडे सादर केलेल्या १७६ नवीन उद्योग प्रकल्पांना माहे फेब्रुवारी २०१८ मध्ये वा त्यादरम्यान जिल्हा कार्यबलाच्या बैठकीमध्ये मंजूरी मिळालेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तथापि, शासनामार्फत आदेश असतानाही अजून पर्यंत मंजूर झालेल्या या १७६ प्रकल्पांना जिल्हा अग्रणी बँकेने निधी उपलब्ध करून दिलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रकल्पांना निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई** : (१) हे खरे नाही.

सन १९९१ पासून बिल्ट ग्राफिक्स पेपर प्रॉडक्टस लि. हा मोठा उद्योग घटक मौजे अष्टी ता.चामुर्शी, जि.गडचिरोली येथे कार्यरत असून रू. १९७.२९ कोटी गुंतवणूक असून ४६३ रोजगार निर्मिती झालेली आहे.

राज्याच्या नवीन औद्योगिक धोरणानुसार गडचिरोली जिल्हा हा विना उद्योग जिल्हा क्षेत्र जाहीर केलेला असून, जिल्ह्यामध्ये स्थापित होणा-या उद्योग घटकांना एकूण स्थिर गुतंवणूकीच्या १०० टक्के प्रोत्साहने देय आहेत. जिल्ह्यांमध्ये सामुहिक प्रोत्साहन योजना २०१३ अंतर्गत २८ लघू उद्योग घटकांना प्राथमिक मंजूरी दिलेली असून त्यामधील गुतंवणूक रू.४७२० लक्ष आहे. सदर घटकांना मुद्रांक शुल्क माफी प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आलेली आहेत. त्यामध्ये ०४ उद्योग घटक उत्पादनात गेलेले असून त्याद्वारे १४४ रोजगार निर्मिती झालेली आहे.

चामोर्शी औद्योगिक क्षेत्राकरिता मौजे कोनसरी, ता.चामोर्शी, जि.गडचिरोली येथील ५१.३२ हे. आर क्षेत्रास म.औ.वि. अधिनियम १९६१ च्या कलम ३२ (१) ची अधिसूचना प्रसिद्ध करण्यास शासनाने दि. ११/०४/२०१८ च्या पत्रान्वये मान्यता दिलेली आहे.

(२) गडचिरोली जिल्ह्यात नवीन सूक्ष्म उद्योग घटक सुरू करण्यासाठी पात्र उद्योजकांचे केंद्र शासनाच्या पंतप्रधान रोजगार निर्मीती कार्यक्रमातंर्गत (PMEGP) सन २०१७-१८ मध्ये प्रश्नाधीन नमूद १७६ प्रकरणासह एकूण २६३ कर्ज प्रकरणे बँकाकडे शिफारस करण्यास्तव जिल्हा कार्यबल समितीने मंजूरी दिलेली होती.

(३) व (४) केंद्र शासनाच्या पंतप्रधान रोजगार निर्मीती कार्यक्रमातंर्गत (PMEGP) सन २०१७-१८ मध्ये एकूण २६३ कर्ज प्रकरणांपैकी एकूण सुमारे रु.५२२.८४ लक्ष प्रकल्प किमंतीची ४५ प्रकरणे बँकांनी मंजूर केलेली असून सदर प्रकरणामधील लाभार्थ्याना रु. १३०.७१ लक्ष अनुदान शासनाकडून वितरीत केलेले आहे. उर्वरीत प्रकरणाबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.

(५) लागू नाही.

-----------------

## हिंगोली जिल्हयातील पात्र लाभार्थ्यांना शबरी घरकुल योजनेंतर्गत घरकुल मिळण्याबाबत

**(५४) * १३०४८० डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयात आदिवासी समाज मोठया संख्येने असून शबरी घरकुल योजनेंतर्गत ५ तालुक्यातील आदिवासी कुटूंबियांनी घरकुलासाठी प्रकल्प अधिकारी यांच्याकडे लाभार्थ्यांचे ११२१ अर्ज प्राप्त झाले असून सन २०१५ ते सन २०१८ या तीन वर्षाच्या कालावधीत हिंगोली जिल्हयाकरीता केवळ ५३ घरकुले मंजूर करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेंतर्गत आदिवासी लाभार्थी पात्र असूनही ते या घरकूलापासून वंचित असल्याने त्यांना घरकुल देण्यात यावे याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १९ जून, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.आदिवासी विकास मंत्री यांना दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले, त्यानुसार हिंगोली जिल्हयातील शबरी घरकुल योजनेंतर्गत घरकुल देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे नाही. शबरी आदिवासी घरकुल योजनेंतर्गत सन २०१५-१६ व सन २०१६-१७ मध्ये २२६ आणि सन २०१७-१८ मध्ये ५३ असे एकूण २७९ घरकुल मंजुर करण्यात आले आहेत. तसेच सन २०१८-१९ मध्ये ५३ घरकुलांचे उद्दीष्ट निश्चित करण्यात आले आहे.

(२) होय.

(३) व (४) शबरी घरकुल योजनेकरीता सन २०१८-१९ मध्ये रु.१५० कोटी इतकी तरतुद अर्थसंकल्पिय करण्यात आलेली आहे. त्यापैकी रु. १०५ कोटी इतकी तरतुद अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर उपलब्ध झालेली असून उर्वरित रु. ४५ कोटी इतकी तरतुद वितरीत करण्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागास सादर करण्यात आलेला आहे.

-----------------

## अमरावती (जि.अमरावती) अपर आयुक्त कार्यालयांतर्गत धारणी प्रकल्प कार्यालयाने खर्च केलेल्या निधीतील तफावतीबाबत

**(५५) * १३३८७६ श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास विभागाच्या अमरावती (जि.अमरावती) अप्पर आयुक्त कार्यालयांतर्गत धारणी प्रकल्प कार्यालयाने सन २००९ पासून ते आतापर्यंत खर्च केलेल्या निधीत तफावत असल्याची बाब दिनांक २६ जून, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच उक्त कार्यालयाने गत सात वर्षात सुमारे ५० कोटींचा निधीच खर्च न केल्याचे दिनांक २७ जून, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असून सुमारे १ कोटी ३ लाखांचे धनादेश दिले परंतु कॅशबुकमध्ये त्याची नोंद नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाकडून प्राप्त निधीतून विविध योजना, उपक्रम राबविण्याकरिता व सोई-सुविधांसाठी अनुदानित आश्रमशाळांना निधी देण्यात आला परंतु अद्यापही धरणी प्रकल्प कार्यालयांने अनुदानित आश्रमशाळांना संपूर्ण निधी वितरित केला नसल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच निधीचा विनियोग योग्य पध्दतीने करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) फेब्रुवारी २०१८ अखेर बॅक खात्याचा रोख पुस्तिकेसोबत ताळमेळ घेतला असता, रु.५.६४/- लाख इतक्या निधीमध्ये तफावत आहे.

(२) जुन, २०१८ अखेर रु.९.८१ कोटी इतका निधी अखर्चित आहे.

(३) हे खरे नाही. अनुदानित आश्रमशाळांमध्ये आढळुन येत असलेल्या विविध त्रुटींची मे, २०१८ अखेर पूर्तता न करणाऱ्या शाळांच्या परिरक्षण अनुदानामध्ये कपात करण्याच्या सूचना शासनपत्र दि.१७/०४/२०१८ अन्वये देण्यात आलेल्या होत्या. त्यानुसार सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धारणी अंतर्गत असलेल्या अनुदानित आश्रमशाळांना परिरक्षण अनुदानासाठी पहिल्या व दुसऱ्या हप्त्यापोटी द्यावयाच्या रु.३.७५ कोटी इतक्या निधीपैकी रु.३.५५ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आलेला असून उर्वरित निधी त्रुटींच्या पूर्ततेअभावी संबंधित संस्थांना वितरीत करण्यात आलेला नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गुंजेगांव (ता.मंगळवेढा, जि.सोलापूर) येथे शॉर्ट सर्किट होऊन शेतकऱ्यांच्या २५ एकर ऊसाचे झालेले नुकसान

**(५६) * १३१२२६ श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुंजेगांव (ता.मंगळवेढा, जि.सोलापूर) येथे डीपीवरील तार तुटून शॉर्ट सर्किट होऊन सुमारे २५ एकर ऊस जळाल्याने १४ शेतकऱ्यांचे लाखो रूपयांचे नुकसान झाल्याची घटना दिनांक १३ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच उक्त गावातील श्री.आप्पा विठ्ठल ढोबळे वय-४५ वर्षे व श्री.चैतन्य आप्पा ढोबळे वय-१५ वर्षे या पिता व पुत्राचा वीजेचा धक्का लागून मृत्यु झाल्याची घटना दिनांक १७ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या दोन्ही घटनांची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले, त्यानुसार ऊस जळालेल्या शेतकऱ्यांना व वीजेचा धक्का लागून मृत्यु झालेल्या मृतांच्या कुटूंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत तसेच अशा घटना रोखण्यासाठी व यास जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर दोन्ही घटनांची चौकशी विद्युत निरीक्षक, सोलापूर यांचे मार्फत करण्यात आली आहे. पहिल्या घटनेमध्ये महावितरण कंपनीने विद्युत संच मांडणीचे योग्य देखभाल व दुरुस्ती न केल्यामुळे ऊस जळीत अपघात घडला. संबंधित १४ शेतकऱ्यांना आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करणेबाबत महावितरण कंपनीतर्फे कळविण्यात आले आहे. सदर आवश्यक कागदपत्रे प्राप्त झाल्यानंतर महावितरण कंपनीच्या नियमानुसार नुकसान भरपाई देण्यासंबंधीची कार्यवाही करण्यात येईल.

दुसऱ्या घटनेमध्ये दोन्ही अपघातग्रस्त व्यक्ती मोटर सुरु असतांना केबल इन्सुलेशन निघालेल्या वाहकाच्या संपर्कात आल्याने वीजेचा धक्का बसून त्यांचा मृत्यू झाला. सदर अपघात ग्राहकांच्या सदोष संच मांडणीमुळे झाला असल्याने विद्युत निरीक्षक कार्यालयामार्फत अपघातग्रस्त व्यक्तीस नुकसान भरपाई देण्याबाबत संबंधित ग्राहकांस कळविण्यात आले आहे.

अशा घटना रोखण्यासाठी दरवर्षी ११ जानेवारी ते १७ जानेवारी दरम्यान विद्युत निरीक्षण कार्यालयामार्फत राज्यभर जन-जागृती करण्यात येते. तसेच मंगळवेढा तालुक्यामध्ये ४४ अपघात प्रवण (धोकादायक विद्युत संच मांडणी) ठिकाणांची माहिती देखभाल दुरुस्ती करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. त्यापैकी ३१ कामे पूर्ण झाली असून त्याअंतर्गत १६ पोल

सरळ करणे, १.२ कि.मी. वाहिनीचे सैल तारा ओढणे (Restringing) व २३५ स्पेसर्स बसविण्यात आलेली आहेत. उर्वरीत १३ कामे डीपीडीसी २०१८-१९ योजनेअंतर्गत प्रस्तावित करण्यात आलेली आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कृषी समृद्धी समन्वयीत कृषी विकास प्रकल्प संचालकांची चौकशी करण्याच्या केलेल्या शिफारशीबाबत

**(५७) * १२७१३० श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.अनिल (अण्णा) गोटे (धुळे शहर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कृषी समृद्धी समन्वयीत कृषी विकास प्रकल्प संचालकांच्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याची शिफारस कृषी व पणन खात्याच्या सचिवांनी केली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माहे एप्रिल, २०१६ ते जून, २०१७ या काळात अमरावती जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या आस्थापनेवरील अधिकाऱ्याने दाखविलेल्या ९ कोटी ८८ लाख इतक्या रकमेच्या खर्चामध्ये त्रुटी असल्याने चौकशी करण्याची शिफारस केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सामान्य प्रशासन विभागाने त्यावर अद्याप कोणताही निर्णय घेतला नसल्याचे ही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, त्याची कारणे काय आहेत तसेच तत्कालीन संचालकांची सखोल चौकशी करण्यात येणार आहे काय, त्यानुसार त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) व (२) होय.
(३) हे खरे नाही.

(४) समन्वयीत कृषी विकास प्रकल्पामध्ये सन २०१६-१७ व २०१७-१८ (जून २०१७ पर्यत) या कालावधीत वित्तीय अनियमितता झाल्याचे निदर्शनास आल्याने तत्कालीन प्रकल्प संचालक, समन्वयीत कृषि विकास प्रकल्प यांचेविरुद्ध विभागीय चौकशीची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच सदर प्रकरणात सहभागी असलेले शासकीय अधिकारी, प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी कंत्राटी पद्धतीने नेमण्यात आलेले कंत्राटी व्यक्ती / संस्था व खाजगी व्यक्ती / संस्था यांचे विरुद्ध लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत कार्यवाही करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भिवंडी (जि.ठाणे) येथील उद्योगांना अखंड विज पुरवठा सुरु करण्याबाबत

**(५८) * १३२४२३ श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडीच्या (जि.ठाणे) ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर उद्योग सुरु असून उद्योजकांना सध्या ५ तास वीज पुरवठा खंडीत स्वरुपात होत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पिपळास भागात जय जलाराम कॉम्प्लेक्स मध्ये ५०० हून अधिक उद्योग कार्यरत असून हजारो कामगार येथे रोजगारासाठी येत असून वीज पुरवठा खंडीत होत असल्यामुळे कामगारांना रोजगार मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या भागात ट्रान्समीटर पासून वीज वाहिन्या बसविण्याकरिता उद्योजकांनी महावितरणला पैसे दिले असतानाही महावितरणकडून केवळ विद्युत देयके देण्याव्यतिरिक्त कोणतेच काम होत नसल्यामुळे उद्योजकांना गैरसोईंना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने अधिक चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार भिवंडीतील उद्योजकांना अखंड वीज पुरवठा करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाच्या योजना पुर्ववत सुरु करण्याबाबत

**(५९) * १२९०५४ श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासींचे जीवनमान उंचावण्यासासह त्यांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी सन १९७२ मध्ये स्थापन केलेल्या महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाच्या ९ पैकी ७ योजना बंद करण्यात आल्याची बाब दिनांक १९ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या महामंडळाच्या संचालक मंडळाची चार महिन्यांतून एकदा बैठक घेणे अनिवार्य असताना गत १० महिन्यांपासून बैठकच घेण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बैठकीअभावी बंद असलेल्या ७ योजना पुर्ववत सुरु करून योजनांची रितसर अंमलबजावणी करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) आदिवासी विकास महामंडळाकडून एकाधिकार खरेदी योजना २९ तालुक्यांमध्ये सुरु आहे. २३ गौणवनउपजापैकी खरेदी केंद्रावर गौणवनउपजाची खरेदी करण्यात येऊन आदिवासी उपयोजना क्षेत्रातील लोकांना केंद्र शासनाचे हमीदराचा लाभ दिला जातो. द्वार वितरण योजनेसाठी जिल्हास्तरावर वाहतुकदार नियुक्त करणेबाबतचे धोरण असल्याने द्वारवितरण योजना बंद आहे. शासकीय आश्रमशाळा पुरवठयाच्या धोरणात बदल होऊन महामंडळाला ई-निविदेत भाग घेता येतो. कर्जाची थकबाकी तसेच अंत्योदय योजनेअंतर्गत अन्नधान्य उपलब्ध होत असल्याने खावटी कर्ज वाटप योजना सद्य:स्थितीत स्थगित करण्यांत आलेली आहे. वीजपंप/तेलपंप योजना व एच.डी.पी.ई. पाईप योजनेची अंमलबजावणी कृषी विभागाकडून करण्यांत येते. तसेच स्वयंपाकांचा गॅस युनिट पुरवठा ही योजना वन विभागाकडे वर्ग करण्यांत आली आहे.

(२) आदिवासी विकास महामंडळाच्या संचालक मंडळाची मागील १० महिन्यांत दि.२७.०३.२०१७, २८.०९.२०१७, १२.१०.२०१७, १७.१२.२०१७, ०२.०५.२०१८ व २८.०९.२०१८ रोजी बैठक संपन्न झाली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील खाजगी व केंद्रीय वीज प्रकल्पांच्या अतिरिक्त ठरणाऱ्या वीजेचा आर्थिक भार ग्राहकांवर पडत असल्याबाबत

**(६०) * १२६६४७ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी क्षेत्रातील रतन इंडिया प्रकल्पाची १३५० मेगावॅट आणि केंद्रीय प्रकल्पातून मिळणारी सुमारे २४०० मेगावॅट एवढ्या अतिरिक्त ठरणाऱ्या वीजेचा सन २०१८-१९ मध्ये राज्यातील वीज ग्राहकांवर सुमारे ३८५० कोटी रुपयांचा आर्थिक भार पडत असल्याची बाब दिनांक २२ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीजेच्या मागणीची पूर्तता करतांना सर्वात स्वस्त वीज प्रथमत: पुरविणे व नंतर गरज पडल्यास महाग वीज वापरण्याचा नियम राज्य वीज नियामक आयोगाने लागू केला असतानाही शासनाने खाजगी कंपन्या व केंद्र शासनाची महागडी वीज वापरण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, शासनाने पारस, परळी, भुसावळ, नाशिक या महानिर्मितीच्या वीज केद्रांमधील वीज न वापरण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, वीज ग्राहकांना स्वस्त दराने वीजपुरवठा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) मा.वीज नियामक आयोगाने मंजूर केलेल्या वीज खरेदी करारातील तरतुदीनुसार निर्मिती संचाचे स्थिर आकार देणे बंधनकारक आहे. वीज निर्मिती संच वीज मागणीच्या प्रमाणात मेरीट ऑर्डर डीस्पॅच (MOD) तत्वानुसार चालविले अथवा बंद केले जातात. त्यामुळे महागड्या वीजेचा आर्थिक भार पडत असल्याचे म्हणणे संयुक्तिक होणार नाही.

(२) व (३) राज्यातील वीजेची मागणी भागविण्याकरीता वीज निर्मिती संच हे वीज मागणीच्या प्रमाणात मा. वीज नियामक आयोगाने ठरवून दिलेल्या मेरीट ऑर्डर डीस्पॅच (MOD) तत्वानुसार चालविले अथवा बंद केले जातात.

(४) विद्युत अधिनियम, २००३ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगातर्फे राज्यातील ग्राहकांचे वीज दर निश्चित करण्यात येतात. तसेच वीज निर्मिती संच वीज मागणीच्या प्रमाणात मेरीट ऑर्डर डीस्पॅच (MOD) तत्वानुसार चालविले अथवा बंद केले जातात. कमी मागणीच्या काळात उपलब्ध असलेल्या अतिरिक्त वीजेची पॉवर एक्सचेंज मध्ये विक्री करुन मिळालेल्या महसुला मार्फत वीज खरेदीचा खर्च कमी करुन ग्राहकांना स्वस्त दराने वीज पुरवठा उपलब्ध केला जातो.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आनंदनगर (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचा विस्तार करण्यासाठी फेज थ्री अंतर्गत पाले गावातील शेतकऱ्यांना भरपाई देण्याबाबत

**(६१) * १३०३७० श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आनंदनगर (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचा विस्तार करण्यासाठी फेज-थ्री अंतर्गत पाले गावातील शेतकऱ्यांची सुमारे १२० एकर जागा कमी दरात ताब्यात घेतली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शेतकऱ्यांना जागा व भरपाई देण्याबाबत कार्यवाही करण्यात आली नसल्याचे दिनांक ५ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्लॉटचे वितरण केलेल्या उद्योजकांच्या जागेवर कोणत्याही सोई-सुविधा पुरविण्यात आलेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) व (२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) हे खरे आहे.

स्थानिक शेतकऱ्यांचा तीव्र विरोध असल्याने सोयी सुविधा पुरविण्यात आलेल्या नाहीत. तथापि, सद्यस्थितीत शेतकऱ्यांचा विरोध कमी झाल्याने सदर कामासाठी नव्याने निविदा प्रकिया पुर्ण झाली असून पुढील प्रक्रिया करण्यात येत आहे.

-----------------

## बुलढाणा जिल्हयात वनमित्र मोहिम राबविण्याबाबत

**(६२) * १२८१९० श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासनाने वन जमीनीवरील अतिक्रमण वनहक्क दावेदाराच्या नावे कायम करण्यासाठी दिनांक ३० मे, २०१८ ते १५ ऑगस्ट, २०१८ या कालावधीत वनमित्र मोहिम राबविण्यासंदर्भात दिनांक १८ मे २०१८ रोजी वा त्यासुमारास प्रशासनाला सूचना देण्यात आल्या होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बुलढाणा जिल्हयात सदरची वनमित्र मोहिम वन विभागाने न राबविल्यामुळे वनजमिनीवरील अतिक्रमणधारक वनहक्क दावेदार यांच्यावर अन्याय झाल्याने ९० अतिक्रमणधारकांनी जिल्हाधिकारी, बुलढाणा यांना निवेदन देऊन त्यांच्या कार्यालयासमोर २७ सप्टेंबर, २०१८ रोजी पासून बेमुदत उपोषणाला बसले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार शासनाने बुलढाणा जिल्हयात सदरील वनमित्र मोहिम न राबविणाऱ्या संबंधितावर कारवाई करण्यासह ९० अतिक्रमणधारकांचे वन जमीनीवरील अतिक्रमण नियमानुकूल करून देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) होय, हे खरे आहे.

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ व नियम, २००८ आणि सूधारित नियम, २०१२ मधील तरतूदींची काटेकोरपणे अंमलबजावणी करुन प्रलंबित वनहक्क दावे व अपिले यांचा निपटारा करण्यासाठी दि. ११ मे, २०१८ अन्वये विशेष “वनमित्र मोहिम” राबविण्यांत येत आहे.

(२) होय, हे अशंत: खरे आहे.

मोताळा तालुक्यातील वनजमिनीवरील अतिक्रमणधारकांनी जिल्हाधिकारी बुलढाणा यांना निवेदन देऊन दि.२७/०९/२०१८ पासून जिल्हाधिकारी, बुलढाणा

कार्यालयासमोर बेमुदत उपोषणाला बसले होते व दि.२९/०९/२०१८ रोजी त्यांनी उपोषण मागे घेतलेले आहे.
(३) व (४) मोताळा तालुक्यातील अपात्र ठरलेल्या ९० अतिक्रमण धारकांनी जिल्हास्तरीय समितीकडे अपिल अर्ज दाखल केले असून सदर अपिल अर्जांबाबत अंतिम निर्णय घेण्यापुर्वी अपिलकर्त्यांना पुन्हा पुरावे दाखल करण्याची शेवटची संधी देण्यांत आली. त्यानुसार तहसिल कार्यालय, मोताळा येथे दि.२६/१०/२०१८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सुनावणी दरम्यान दाखल केलेल्या पुराव्यांच्या आधारे तपासणी करण्यात आलेले सर्व अपिल अर्ज तसेच उपविभागीय स्तरावर अपात्र ठरलेल्या दाव्यांबाबत अंतिम निर्णय घेण्याची कार्यवाही दि.१५/१२/२०१८ पर्यंत पुर्ण करण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी, बुलढाणा यांना कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परळी (जि.बीड) येथील औष्णिक विद्युत केंद्राचे काम विहित मुदतीत केले नसल्याने महाजनको कंपनीचे झालेले आर्थिक नुकसान

**(६३) * १३३०७५ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परळी (जि.बीड) येथील औष्णिक विद्युत केंद्रातील २५० मे.वॅ. ऊर्जानिर्मिती प्रकल्पाचे काम महाजनकोने सुनिल हायटेक कंपनीला दिले असता करारानुसार सदर कंपनीने मुदतीच्या आत प्रकल्पाचे काम पुर्ण केले नसल्यामुळे महाजनकोला कोट्यावधी रूपयांचे नुकसान झाले असल्याची माहिती दिनांक १५ ऑक्टोंबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिलेल्या मुदतीत सुनिल हायटेक कंपनीने काम केलेले नसल्यामुळे सदर कंपनी विरोधात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे व त्याचा तपशिल काय आहे,

(३) तसेच, दिलेल्या मुदतीत प्रकल्पाचे काम पुर्ण करण्यात आले नसल्याने महाजनको कंपनीला झालेल्या नुकसानाची भरपाई सुनिल हायटेक कंपनीकडून वसूल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) महानिर्मिती कंपनीच्या परळी प्रकल्प संच क्र. ८ चे उर्वरित संयंत्र यंत्रणा उभारण्याकरिता मे. सुनिल हायटेक, नागपूर या कंत्राटदाराची नेमणूक करण्यात आली होती व कामाचे आदेश दिनांक ०१.०१.२०१० ला देण्यात आले होते. सदर कामे पूर्ण करण्याचा कालावधी कामाच्या आदेशापासून २४ महिने होता. सदर संच वाणिज्यिक तत्वावर १९.११.२०१६ रोजी सूरु झाला असून संचाद्वारे वीज निर्मिती चालू आहे. सदर प्रकल्प उभारणीच्या कामात खालील कारणांमुळे विलंब झाला :-

१) त्या भागातील सन २०१२, २०१३, २०१४ व २०१५ च्या दुष्काळी परिस्थितीमुळे पाणी पुरवठयात झालेली कमतरता.

२) कंत्राटदाराकडून साधन सामूग्रीच्या पुरवठयात व उभारणीच्या कामाची धीमीगती.

३) सुनिल हायटेक कंपनीची बिघडलेली वित्तीय अवस्था व त्यामुळे उपकंत्राटदारानी आर्थिक कारणांमुळे थांबविलेले काम.

४) कंत्राटदाराकडून अपुरे अकुशल कामगारांची केलेली भरती.

५) सुनिल हायटेक कंपनीने वारंवार बदललेल्या उपकंत्राटदार व विक्रेत्यामुळे (Vendors) कामात विलंब झाला.

(२) व (३) प्रकल्प पूर्ण होण्याच्या विलंबास कंत्राटदार जबाबदार असल्यास, आदेशित किंमतीच्या कमाल १०% एवढी रक्कम नुकसान भरपाई (Liquidated Damages) मुख्य संयंत्र व उर्वरित संयंत्र कंत्राटदाराकडून वसूल करण्याची तरतूद कंत्राटात आहे. सदर प्रकल्प पूर्ण होण्यास विलंब झाला असून सदर विलंबास प्रथम दर्शनी कंत्राटदार मुख्यत्वे जबाबदार असल्याचे दिसून येत असल्यामुळे, सुनिल हायटेक कंपनीने दिलेल्या बँकेच्या हमी रकमेमधून (Bank Guarantee) रुपये ८३.३० कोटी वसूली महानिर्मिती कंपनीने केली आहे. उर्वरित कामे ही सुनिल हायटेक कंपनीने यांच्या जोखीम आणि खर्च (Risk & Cost) वर करण्याचे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

## सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत शिष्यवृत्तीची रक्कम मिळण्याबाबत

**(६४) * १२९०६७ श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मागासवर्गीय विद्‌यार्थीनींना शिक्षणाचा लाभ घेता यावा यासाठी शासनाने सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना लागू केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागासवर्गीय विद्‌यार्थीनीकडून महाविद्‌यालयातर्फे सर्व प्रकारची कागदपत्रांची पूर्तता करुन देखील ७५ टक्के विद्‌यार्थिनींच्या खात्यात सावित्रीबाई फुले शिष्यवृत्तीची रक्कम जमा झालेली नसल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने मागसवर्गीय विद्‌यार्थीनींना सदर योजनेअंतर्गत मिळणारी रक्कम त्यांच्या खात्यात जमा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.

(२) अंशतः होय.

(३) अनुसूचित जातीच्या विद्‌यार्थ्यांचे सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजनेचे प्रस्ताव तपासून जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांच्याकडे सादर केलेले नाहीत, त्यांना तात्काळ प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत. तसेच व्हिडिओ कॉन्फरन्सद्‌वारे देण्यात आलेल्या सूचनांनुसार संबंधित जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांच्यामार्फत योजनेअंतर्गत पात्र विद्‌यार्थ्यीनीची

शिष्यवृत्तीची रक्कम त्यांच्या आधारसंलग्न बँक खात्यावर जमा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बागलाण (जि.नाशिक) तालुक्यातील गावांसाठी ३३/११ के.व्ही. वीज उपकेंद्र सुरु करण्याबाबत

**(६५) * १२८५०८ श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बागलाण (जि.नाशिक) तालुक्यातील शेतकऱ्यांना उच्च दाबाने विद्यूत पूरवठा होत नसून वारंवार वीज खंडीत होत असल्यामुळे ब्राम्हणगांव, चौगांव, गोळवाड, उत्राणे, दसवेल व कंधाणे येथे ३३/११ केव्हीचे विद्यूत उपकेंद्र सूरु करावे अशी मागणी तेथील शेतकऱ्यांनी व लोकप्रतिनिधींनी मा.उर्जा मंत्री यांच्याकडे दिनांक १७ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पंडित दिनदयाळ उपाध्याय ग्रामीण विद्युतीकरण योजनेंतर्गत महावितरण कंपनी, नाशिक यांनी बागलाण तालुक्यातील या गावांसाठी ३३/११ केव्ही विद्यूत उपकेंद्राचा समावेश केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांना शेतीपंपासाठी व घरगूती ग्राहकांची मागणी लक्षात घेता सदर विद्यूत उपकेंद्रांना मान्यता देवून त्यासाठी निधी उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) उच्चदाब वीज वितरण प्रणाली (HVDS) योजनेअंतर्गत ब्राम्हणगांव व चौगाव उपकेंद्राचा समावेश करण्यात आला आहे. गोळवाड उपकेंद्राचा समावेश जिल्हा नियोजन समिती अंतर्गत आदिवासी उपयोजनेमध्ये (DPDC-TSP) करण्यात आलेला आहे. उन्नान व दसवेल येथील उपकेंद्राचा समावेश निधीच्या उपलब्धतेनुसार नवीन येणाऱ्या योजनेत करण्यात येणार आहे. कंधाने येथील उपकेंद्र तांत्रिकदृष्ट्या वैध नसल्याने (Technically not feasible) प्रस्तावित नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील आदिवासी शासकीय आश्रमशाळा व एकलव्य शाळांमधील विद्यार्थ्यांना मोफत आरोग्य सुविधा देण्याबाबत

**(६६) * १२८१७६ श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २०१ शासकीय आदिवासी आश्रमशाळा व ६ एकलव्य शाळांमधील सुमारे ८५ हजार विद्यार्थ्यांना मोफत आरोग्य सुविधा देण्याचा निर्णय शासनाने माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरोग्य सुविधा देण्याचे काम मे. अमेय लाईफ या कंपनीला देण्यात आले असून त्याकरीता सुमारे ११.२२ कोटींची तरतूदही शासनाने केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निर्णयाची अंमलबजावणी त्वरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) व (२) होय, सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक सुचना आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय दि.१२.०९.२०१८ अन्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत. या योजनेअंतर्गत राज्यातील २०१ शासकीय आश्रमशाळा व ६ एकलव्य शाळांमधील सुमारे ८५ हजार

विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी (Screening) करून संगणकीकृत प्रणालीवर आरोग्य पत्रिका तयार करणे व तज्ञ डॉक्टरांचे पॅनेलमार्फत वैद्यकीय सल्ल्यासाठी नियंत्रण कक्षाची स्थापना नाशिक येथे करण्यात आलेली आहे.
(३) व (४) सदर योजनेचे कार्यारंभ आदेश संबंधित अंमलबजावणी यंत्रणेस दि.०१.१०.२०१८ रोजी देण्यात आले असून विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी सुरू करण्यात आलेली असून योजना कार्यान्वित झालेली आहे.

-----------------

## हिंगणा (जि.नागपूर) तालुक्यामधील आश्रमशाळेत जादा पटसंख्या दाखवून केलेला गैरव्यवहार

**(६७) * १३१२७२ डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगणा (जि.नागपूर) तालुक्यामधील आश्रमशाळेत जादा विद्यार्थी दाखवून संस्थाचालक व शासकीय कर्मचारी/अधिकारी यांनी संगनमताने सुमारे ६२ लाख रुपयांचा गैरव्यवहार केल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील अनेक आश्रामशाळांत संचालकांमार्फत बोगस पटसंख्या दाखवून शासनाची फसवणूक करण्यात येत असल्याची शक्यता नाकारता येत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील आश्रमशाळांची पटसंख्या तपासणी उच्चस्तरीय समिती गठीत करून करण्यात येणार आहे काय तसेच यात दोषी आढळणाऱ्या संबधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी ॲन्टी करप्शन ब्युरो, नागपूर यांनी चौकशी केली असून त्यामध्ये तथ्य आढळून आले असून प्रकल्प अधिकारी, नागपूर यांनी सदर

शाळेवर प्रशासक नेमण्याची शिफारस अपर आयुक्त, नागपूर यांच्यामार्फत आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांना केली आहे.

(२) सद्यस्थितीत राज्यातील इतर अनुदानित आश्रमशाळा वाढीव पटसंख्या दाखवून शासनाची फसवणूक करीत असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(३) अनुदानित आश्रमशाळांमधील सोयी-सुविधा, पटसंख्या व शैक्षणिक उपक्रमांबाबत प्रत्येक वर्षी तपासणी मोहीम राबविण्यात येते. प्रत्येक शाळेला मिळालेल्या गुणांकनानुसार श्रेणी देण्यात येते. "ड" श्रेणीत आढळून येणाऱ्या शाळांचे परिरक्षण अनुदान रोखण्यात येऊन शाळेने सुधारणा न केल्यास विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन शाळेची मान्यता रद्द करण्याबाबत कार्यवाही करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील कृषीपंपाच्या वीज देयकांत दुरुस्ती करण्याबाबत

**(६८) * १२६६१६ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कृषी पंपाच्या मीटर्सचे प्रत्यक्षात वाचन घेऊन वीज देयकात दुरुस्ती करण्यासाठी वीज ग्राहक संघटनेने आझाद मैदानात धरणे आंदोलन केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तद्नंतर झालेल्या बैठकीत वीज देयक सरासरी ५३ टक्क्यांनी कमी होत असल्याचे अधिकाऱ्यांना व मा.मुख्यमंत्र्यांना पुराव्यासह सादर करण्यात आले असता मा.मुख्यमंत्री आणि मा.उर्जा मंत्री यांनी दिनांक १५ ऑगस्ट, २०१८ पर्यंत सर्व ४१ लाख शेतकऱ्यांची वीज देयके दुरुस्त केली जातील व नवीन कृषी संजीवनी योजना जाहीर केली जाईल व नवीन सवलतीचे वीजदर निश्चित केले जातील, असे आश्वासन शिष्टमंडळाला दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी माहे सप्टेंबर, २०१८ अखेर एकाही शेतकऱ्याच्या वीज देयकात बदल करण्यात आलेला नसून याप्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कृषी पंपाच्या वीज देयकांत सुधारणा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) महावितरणच्या दिनांक २८.१२.२०१७ च्या परिपत्रकानुसार शेतीपंपाची वीज देयकाबाबतच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी उपविभागीय स्तरावर वाहिनीनिहाय शिबीरे आयोजित करण्यात आलेली असून त्यामध्ये कृषी पंप ग्राहकांच्या तक्रारीचे निवारण करण्यात येत आहे. सदर मोहिमेमध्ये राज्यात माहे सप्टेंबर, २०१८ अखेर २५०६ शिबीरे आयोजित करण्यात आलेली असून त्यामध्ये कृषीपंप देयकाच्या ५४,१९६ कृषीग्राहकांच्या वीज देयकांची दुरुस्ती करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात आदिवासी विकास विभागाच्या 'अ' ते 'ड' या संवर्गाच्या सहा हजार जागा रिक्त असल्याबाबत

**(६९) * १२६८२७ श्री.संजय पोतनीस (कलिना), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.भारत**

**भालके (पंढरपूर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आदिवासी विकास विभागाच्या 'अ' ते 'ड' या संवर्गाच्या सुमारे सहा हजार जागा रिक्त असल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात आदिवासी विकास विभागात १३ हजार ७८१ अधिकारी व कर्मचारी कार्यरत असून गेल्या अनेक वर्षापासून विभागात पदे रिक्त असल्याने अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे आदिवासी विकासाच्या अनेक योजनांची अंमलबजावणी होत नाही हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी उक्त जागा रिक्त राहण्यामागची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय त्यात काय, आढळून आले तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) आदिवासी विकास विभागांतर्गत एकूण ७३८५ पदे रिक्त आहेत.

(२) कार्यरत कर्मचाऱ्यांकडून योजनांची अंमलबजावणी करून घेण्यात येत आहे.

(३) अधिकारी/कर्मचाऱ्यांची सेवानिवृत्ती, पदोन्नती, पदभरतीवरील निर्बंध तसेच मा.उच्च न्यायालयाची स्थगिती इत्यादी कारणांमुळे पदे रिक्त राहिली आहेत.

(४) व (५) पदोन्नतीची रिक्त पदे भरण्याबाबत पदोन्नतीची कार्यवाही सुरू आहे. आश्रमशाळा व वसतीगृहातील वर्ग-३ मधील सरळसेवेची सर्व रिक्त पदे भरण्यासाठी प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. वित्त विभागाच्या सुचनेनुसार वर्ग-४ ची २५% पदे निरसित करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## राज्य शासनाने सूतगिरण्या, यंत्रमाग, कापड प्रक्रिया आदी उद्योगांना अनुदान देऊन राज्यात वस्त्रोद्योगाचा विकास करण्याबाबत

**(७०) * १२६७९९ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नागपूर, कोल्हापूर, सोलापूर व अमळनेर येथे असलेल्या वस्त्रोद्योग महामंडळाच्या वर्षानुवर्ष विनावापर पडून असलेल्या जमिनी विकणार असल्याचा प्रस्ताव महामंडळाने शासनाकडे पाठविला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या जमीन विक्रीतून येणाऱ्या पैशाचा वापर वस्त्रोद्योग विकासासाठी होणार असून, एका आर्थिक वर्षात ९ हजार ६०० टन व त्यापेक्षा अधिक कापूस जेथे पिकतो तेथेच सूतगिरण्या उभारण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने जाहिर केलेल्या वस्त्रोद्योग धोरणात विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रासाठी सवलती देतांना वेगवेगळे धोरण ठरविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त प्रकरणी एक राज्य एक धोरण राबविण्याबाबत व सूतगिरण्या, यंत्रमाग, कापड प्रक्रिया आदी उद्योगांना अनुदान देऊन राज्यात वस्त्रोद्योग विकास करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) महाराष्ट्र राज्याचे नविन वस्रोद्योग धोरण दि. १५/०२/२०१८ रोजी जाहीर करण्यात आले आहे. या धोरणात वस्रोद्योगाच्या सर्वांगीण विकासासाठी विविध अनुदाने प्रस्तावित केली आहेत. या धोरणात विदर्भ, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्रातील कापूस उत्पादक क्षेत्रात जास्तीत जास्त वस्रोद्योग स्थापन व्हावेत यासाठी अधिकची प्रोत्साहने जाहीर केली आहेत.

सहकारी तत्वावर चालविण्यात येणाऱ्या सुतगिरण्यांकरीता भाग भांडवलाची योजना ही फक्त कापूस उत्पादक तालूक्यामध्ये राबविण्यात येईल. ज्या तालूक्यामध्ये उत्पादित होणाऱ्या कापसापैकी ५० टक्के पेक्षा जास्त किंवा ५००० टन पेक्षा जास्त कापूस उपलब्ध असेल अशाच तालूक्यात सदर योजना राबविण्यात येईल असे जाहीर केले आहे.

वस्रोद्योगाच्या साखळीमधील सर्व प्रक्रीया उद्योगांवर विशेष भर देऊन तसेच राज्यात उत्पादित होणाऱ्या कापूस, रेशीम, लोकर, अन्य अपारंपारीक तंतूवर व मानव निर्मित तंतूवर प्रक्रिया होवून रोजगार निर्मिती व्हावी यासाठी नविन वस्रोद्योग धोरण जाहीर करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## एकलहरे व भुसावळ (जि.नाशिक) येथील वीजनिर्मिती संच पुढील दोन वर्षात टप्प्याटप्प्याने बंद करणार असल्याबाबत

**(७१) * १२८८४२ श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकलहरे (जि.नाशिक) येथील औष्णिक विजनिर्मिती केंद्रातील २१० मेगावॅट क्षमतेचे तिन्ही संच सन २०१९ ते जानेवारी २०२१ पर्यंत टप्प्याटप्प्याने बंद करून विदर्भातील उमरेड येथे नव्याने औष्णिक विज निर्मिती प्रकल्प उभारण्यात येणार असल्याची बाब दिनांक ९ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकलहरे प्रकल्पासोबतच भुसावळचा विजनिर्मिती प्रकल्प देखील बंद करण्यात येणार असून तसे लेखी पत्र माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यासुमारास वीज निर्मिती कंपनीने राज्य विद्युत नियामक आयोगाला दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एकलहरे औष्णिक वीजनिर्मिती प्रकल्पाकरिता असलेला कोळसा विदर्भातील खाजगी कंपनीला विकून विदर्भात नवीन औष्णिक विजनिर्मिती प्रकल्प उभारण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, एकलहरे विजनिर्मिती प्रकल्पाची मुदत सन २०१९ मध्ये संपत असुन राज्यात नवीन विज निर्मिती प्रकल्प उभारावयाचा झाल्यास एकलहरेलाच प्राधान्य देण्याचे मा.उर्जामंत्र्यांनी आश्वासित केले होते, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त नमूद प्रकल्प पुर्ण क्षमतेने सुरु करण्याबाबत व एकलहरे येथे प्रकल्प पुन्हा उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) केंद्रीय विद्युत प्राधिकरणाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, जुन्या विद्युत निर्मिती संचांची आयुर्मर्यादा ४० वर्षे ठरवून त्यानुसार आयूर्मान संपलेले संच, नवीन संचांचे कार्यान्वयन सुरु झाल्यानंतर टप्प्या टप्प्याने बंद करण्यात येणार आहेत. याप्रमाणे, एकलहरे (नाशिक) येथील संच क्र. ३ व भुसावळ संच क्र. २ व ३ बंद करुन त्याबदल्यात Super-Crtitical तंत्रज्ञानावर आधारित जास्त क्षमतेचे संच, म्हणजेच भुसावळ येथे ६६० मे.वॅ. संच क्र. ६ व उमरेड परिसर येथे २x८०० मे.वॅ. चे नवीन संच उभारण्याचे प्रस्तावित आहे.
(३) वीज निर्मितीचा खर्च कमी करण्याच्या दृष्टीने देशांतर्गत कोळसा वापरामध्ये लवचिकता आणण्यासाठी केंद्र सरकारने आखलेल्या धोरणानुसार महानिर्मितीच्या भुसावळ संच क्र. ३ आणि नाशिक येथील एका संचाला पुरविला जाणारा कोळसा निविदा प्रक्रियेद्वारे खाजगी वीज निर्मिती कंपन्यांना तात्पुरत्या स्वरुपात (१ एप्रिल, २०१८ ते २९ नोव्हेंबर, २०१८ अशा आठ महिन्यांकरिता) देऊन त्याबदल्यात त्यांच्याकडून वीज खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे. यातून तयार होणाऱ्या वीजेचा प्रती युनिट दर महानिर्मितीच्या भुसावळ संच क्र.३ व नाशिक येथील संचांच्या दराच्या तुलनेत कमी आहे. मात्र त्यासाठी विदर्भात नवीन औष्णिक विजनिर्मिती प्रकल्प उभारण्यात येणार नाहीत .

सदर खाजगी वीज कंपनी, महानिर्मिती आणि महावितरण यांच्यात त्रिपक्षीय करार करण्यात आला आहे.

(४) नाशिक येथील सध्याच्या संचांची वयोमर्यादा पुढीलप्रमाणे आहे -

नाशिक संच क्र. ३-एप्रिल, २०१९, संच क्र. ४-जुलै, २०२० आणि संच क्र.५-जानेवारी, २०२१ तथापि या संचांच्या बदल्यात उभारण्यात येणारे नवीन संच, म्हणजेच संच क्र.३ करिता भुसावळ संच क्र.६ व संच क्र. ४ व ५ करिता उमरेड किंवा नजीकचे प्रस्तावित २ x ६६० MW संच, कार्यान्वित झाल्या शिवाय, नाशिक येथील संच बंद करण्यात येणार नाहीत. त्याचप्रमाणे नाशिक औष्णिक विद्युत प्रकल्पासाठी आवश्यक उंचीचे धुरांडे बांधण्यासाठी संरक्षण मंत्रालय, भारत सरकार यांचेकडून विमानपतन “ना-हरकत परवाना” अद्याप प्राप्त व्हायचा आहे. तसेच महाराष्ट्र राज्यातील उर्जेची मागणी व पुरवठा यांची सद्यस्थिती लक्षात घेऊन, नाशिक औष्णिक विद्युत केंद्राच्या प्रस्तावित संच क्र.६ च्या प्रकल्पाला २०२१-२२ पर्यंत तात्पुरती स्थगिती देण्यात आलेली आहे.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.